रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १५ ◆ अंक ३०३
www.ramprahar.com

# राम प्रहर

सोमवार, २२ मे २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर वाहतूक कॉरीडॉर उपाय/२
मुरुड किनारा होणार विकसित; सुशोभिकरणाला सुरुवात/५
तायक्वांदो चॅम्पियन सिरीजमध्ये रायगडच्या कराटेपटूंची चमक/८

## आता राष्ट्रवादीच्या जागेवर काँग्रेसचा दावा



**सोलापूर** : येथे झालेल्या काँग्रेसच्या निर्धार महामेळाव्यात सोलापूरसह माढा लोकसभेसंदर्भात कामाला लागण्याचे आदेश प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिले आहेत. मागे राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी काँग्रेसच्या पारंपरिक सोलापूर मतदारसंघावर दावा सांगितला होता. आता काँग्रेसने राष्ट्रवादीच्या माढा मतदारसंघावर दावा केला आहे. लोकसभा निवडणूक एक वर्षावर येऊन ठेपली असून राजकीय पक्ष तयारीला लागले आहेत. अशात महाविकास आघाडीत जागावाटपावरून आतापासूनच रस्सीखेच सुरू झाल्याचे पाहायला मिळत आहे. सोलापूर आणि माढा या दोन जागांवरून काँग्रेस आणि राष्ट्रवादीत रस्सीखेच सुरू आहे. वास्तविक सोलापूर लोकसभेची जागा काँग्रेसकडे, तर माढा जागा राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहे. काही दिवसांपूर्वी या जागांवर राष्ट्रवादीने दावा सांगितला होता. आता काँग्रेसनेही या दोन्ही जागांवर दावा केला आहे.

# स्वच्छता अभियान लोकचळवळ व्हावी

### मुख्यमंत्र्यांचे प्रतिपादन



**मुंबई : प्रतिनिधी**

जी-२० परिषदेच्या पर्यावरण आणि हवामान शाश्वतता कार्यगटाच्या तिसऱ्या बैठकीला जी-२० समुद्र किनारा स्वच्छता मोहिमेने सुरुवात करण्यात आली. राज्यपाल रमेश बैस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समुद्रकिनारा स्वच्छतेची शपथ देऊन स्वत: जी-२० परिषदेतील सदस्य राष्ट्रांच्या प्रतिनिधींसमवेत स्वच्छता केली. स्वच्छता अभियानामध्ये लोकचळवळीची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या वेळी केले.

मुंबईतील जुहू बीच येथे आयोजित या मोहिमेत केंद्रीय पर्यावरण व वनेमंत्री भूपेंद्र यादव यांनीही उपस्थितांना स्वच्छतेची शपथ दिली. या उपक्रमाला केंद्रीय पर्यावरण राज्यमंत्री अश्विनीकुमार चौबे, पर्यटन मंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार अमित साटम, प्रधान सचिव प्रवीण दराडे, महापालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल आदी उपस्थित होते.

जी-२० परिषदेतील विविध देशांच्या प्रतिनिधींचे स्वागत करून मुख्यमंत्री म्हणाले, मुंबई हे गतिशील शहर असून देशाचे ग्रोथ इंजिन असलेले शहर आहे. मातृभूमी संरक्षणाचा संदेश संत ज्ञानेश्वरांनी दिला आहे. मातृभूमी ही मानवी जीवनासाठी वरदान असून आपण त्याचे रक्षणकर्ते आहोत. त्यासाठी आपल्या आयुष्यातील प्रत्येक कार्य पर्यावरणपूरक असावा, असा संदेश या स्वच्छता मोहिमेतून पोहचावा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४मध्ये स्वच्छता अभियानाला सुरुवात केली. त्यानंतर या अभियानाने जनआंदोलनाचे स्वरूप घेतले आहे. देशातील प्रत्येक गाव, शहर स्वच्छतेच्या दिशेने पाऊल टाकत आहेत. राज्य शासनानेही पर्यावरण संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू केले असून त्यासाठी पाऊले उचलली आहेत. यात मोठ्या प्रमाणात लोकसहभाग वाढावा यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. स्वच्छता अभियानामध्ये लोकचळवळीची आवश्यकता आहे. **(पान २ वर..)**

### नागरिकांशी संवाद

जुहू बीच येथे आयोजित जी-२० मेगा बीच क्लीन अप मोहिमेदरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बीचवर येणाऱ्या नागरिकांशी संवाद साधला. बीच स्वच्छ आहे ना, असा प्रश्न मुख्यमंत्र्यांनी विचारला असता 'होय, आम्ही रोज या ठिकाणी येत असतो,' असा प्रतिसाद नागरिकांनी दिला. तुमच्या काही सूचना असतील तर त्या नक्की कळवाव्यात, असे आवाहनदेखील मुख्यमंत्र्यांनी या वेळी नागरिकांना केले.

## खालापूर नगरपंचायतीमध्ये अपहार

### नागरिकांच्या रकमेवर कारकुनाचा डल्ला

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर नगरपंचायतीमध्ये साडेपाच लाख रुपयांचा अपहार झाला असून नागरिकांकडून कर स्वरूपात आलेली रक्कम कारकुनाने परस्पर वापरल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

नगरपंचायत हद्दीतील घरपट्टी आणि पाणीपट्टीची वसूल झालेली रक्कम बँक खात्यात न भरता त्याचा परस्पर वापर करण्यात आला. करवसुली रूपाने झालेली रक्कम नगरपंचायत खात्यात भरण्याची जबाबदारी लेखापालाची असताना ती कारकुनावर सोपवण्यात आली होती. कारकुनाने जवळपास साडेपाच लाखांची रक्कम नगरपंचायतीच्या बँक खात्यात न भरता वैयक्तिक कारणाकरिता वापरली. या प्रकरणी कारकुनाला नोटीस बजावण्यात आली आहे. विशेष म्हणजे ३१ मार्चला बजेट मंजूर करताना ही वित्तीय तूट झाकण्यात आली. एकीकडे नगरपंचायत तिजोरीत निधी नसल्याचे कारण सांगून पाणी व अन्य मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होत असताना नागरिकांच्या पैशाचा अपहार होत असल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे.



**साडेपाच लाख रकमेपैकी पाच लाख रुपयांची वसुली करण्यात आली आहे. उर्वरित रक्कमदेखील लवकरच वसुली करण्यात येईल.**
**-अजय झोरी, लेखापाल, खालापूर नगरपंचायत**

**नगरपंचायतीचा कारभार पारदर्शक हवा. अशा प्रकारे घोटाळा होत असेल, तर या प्रकरणाला जबाबदार सर्वांवर कारवाई व्हायला हवी.**
**-सुप्रिया साळुंखे, नगरसेविका, खालापूर नगरपंचायत**

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून न्हावे विद्यालयाची पाहणी; सर्वतोपरी मदतीची ग्वाही

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शनिवारी (दि. २०) रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल तालुक्यातील न्हावे येथील न्यू इंग्लिश स्कूल येथे भेट देऊन नूतन इमारतीची पाहणी केली. या वेळी त्यांनी उर्वरित काम टीआयपीएल कंपनीकडून पूर्ण करून देण्याचे जाहीर केले तसेच विद्यालयासाठी सुसज्ज व अद्ययावत प्रयोगशाळा, संगणक कक्ष आणि ग्रंथालय बांधण्यास ५० लाख रुपयांची देणगी जाहीर केली.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या समवेत 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत भोईर, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, स्कूल कमिटी सदस्य आर. ए. म्हात्रे, चंद्रकांत पाटील, मोरेश्वर पाटील, मोरेश्वर पाटील, बाळूशेठ भोईर, विशाल भोईर, दीपक भोईर, भाजप गाव कमिटी





अध्यक्ष तुषार भोईर, ग्रामपंचायत सदस्य सागरशेठ ठाकूर, देवेंद्र भोईर, म्हसेश्वर मंदिर कमिटीचे अध्यक्ष सी. एल. ठाकूर, राम मोकल, किशोर पाटील, अनिल भोईर, रूपेश घरत, जयंत पाटील, नितीन भोईर, मीनाक्षी पाटील, रंजना घरत, जॉर्ज मिनीजिस, विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रमोद कोळी, माजी मुख्याध्यापक जी. एम. कोळी, 'रयत'चे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, महिला मंडळ अध्यक्ष मीनाक्षी पाटील आदी उपस्थित होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ३० लाख रुपये अर्थसहाय्यातून न्हावे गावासाठी जलकुंभ बांधण्यात आला आहे. या जलकुंभाची तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या खासदार निधीतून बांधण्यात आलेल्या समाजमंदिराचे नूतनीकरण व वनिता महिला मंडळासाठी उभारण्यात आलेल्या कार्यालयाच्या कामाचीही लोकनेते रामशेठ ठाकूर व अन्य मान्यवरांनी पाहणी केली.

शैक्षणिक, सामाजिक कार्यासाठी सातत्याने सहकार्य करीत असल्याबद्दल सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे आणि ग्रामस्थांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे विशेष आभार मानले.

## निवडक

### प्रसिद्ध अभिनेत्री सुचंद्रा दासगुप्ताचा अपघाती मृत्यू

**कोलकाता** : बंगालच्या टीव्ही इंडस्ट्रीमध्ये प्रसिद्ध असलेली अभिनेत्री सुचंद्रा दासगुप्ता हिचा रस्ते अपघातात मृत्यू झाला. सुचंद्रा शनिवारी रात्री शूटिंगवरून परतत असताना तिच्या बाईकसमोर सायकलस्वार आला. त्यामुळे तिने ब्रेक मारला असता एका ट्रकने या अभिनेत्रीला धडक दिली. यात तिचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर मनोरंजन विश्वावर शोककळा पसरली आहे.

### मुंबईचा हैदराबादवर शानदार विजय; ग्रीनची शतकी खेळी

**मुंबई** : आयपीएलमध्ये रविवारी (दि. २१) मुंबई इंडियन्सने सनरायझर्स हैदराबादचा आठ गडी राखून पराभव केला आहे. नाणेफेक हरल्यानंतर हैदराबादने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ५ बाद २०० धावांचा डोंगर उभारला होता. मुंबईने हे आव्हान कॅमेरून ग्रीनच्या नाबाद वादळी शतकाच्या (४७ चेंडूंत १०० धावा) जोरावर दोन गडी गमावून १८ षटकांतच पार केले.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज नेरळजवळील सगुणाबागमध्ये

### कृषी, जल आणि पर्यावरणविषयक प्रकल्पांची करणार पाहणी

**कर्जत : प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोमवारी (दि. २२) नेरळजवळील सगुणाबाग कृषी पर्यटन केंद्रास भेट देणार आहेत. कृषीरत्न शेतकरी शेखर भडसावळे यांच्या जल, कृषी आणि पर्यावरणविषयक प्रकल्पांची पाहणी मुख्यमंत्री करणार आहेत. त्याचवेळी सगुणा रुरल फाऊंडेशनकडून आयोजित सगुणा राईस टेक्निक (एसआरटी) पद्धतीने शेती करणाऱ्या राज्यातील ३० शेतकऱ्यांचा मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सन्मान होणार आहे.



या सोहळ्याला राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, खासदार श्रीरंग बारणे, स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांच्यासह देवगिरी कल्याण आश्रम (बारीपाडा, धुळे) येथील चैतराम पवार, कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, कृषी प्रकल्प संचालक डॉ. परिमल सिंह, रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, कोकण कृषी अधीक्षक अंकुश माने प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती देण्यात आली.

## दोन हजारांच्या नोटा बदलून घेण्यासाठी नियमावली जारी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय रिझर्व्ह बँकेने दोन हजार रुपयांच्या नोटा चलनातून बाद होत असल्याची घोषणा केल्यानंतर आता या संदर्भात मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत.



दोन हजारांच्या नोटा बदलण्याचे काम २३ मेपासून सुरू होणार असून नागरिक ३० सप्टेंबरपर्यंत बँकेत जाऊन नोटा बदलून घेऊ शकतात. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या गाईडलाईन्सनुसार एकावेळी २० हजार रुपयांच्या मर्यादेपर्यंत या नोटा बदलण्याची सुविधा असेल. याचाच अर्थ नागरिक एका वेळी १० नोटा बदलून घेऊ शकतात. यासाठी ग्राहकांना कोणत्याही प्रकारचे ओळखपत्र सोबत बाळगण्याची गरज भासणार नाही तसेच कोणताही फॉर्म किंवा स्लिप भरण्याचीही आवश्यकता नाही.

# युवा वॉरियर्स व्हॉलीबॉल, फुटबॉल चषक स्पर्धा रंगली




### माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यापैकी खारघर येथील गोखले शाळेच्या मैदानात रंगलेल्या युवा वॉरियर्स व्हॉलीबॉल चषक स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते, तर खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या युवा वॉरियर्स फुटबॉल चषक स्पर्धेचे उद्घाटन माजी नगरसेवक अनिल भगत यांच्या हस्ते शनिवारी (दि. २०) झाले. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी फुटबॉल स्पर्धेला भेट देत खेळाडूंना प्रोत्साहित केले.



खारघरमधील व्हॉलीबॉल चषक स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास भाजपचे खारघर मंडळ अध्यक्ष ब्रिजेश पटेल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजीव शेजवळ, माजी नगरसेवक हरेश केणी, रामजी बेरा, प्रवीण पाटील, अभिमन्यू पाटील, नरेश ठाकूर, गुरूनाथ गायकर, माजी नगरसेविका अनिता पाटील, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष मयुरेश नेतकर, दीपक शिंदे, किरण पाटील, विजय पाटील, रमेश खडकर, वासुदेव पाटील, विपूल चौतालिया, प्रभाकर बांगर, दिनेश खानावकर, विनोद घरत, नितेश पाटील, शुभ पाटील, अतुल पाटील, अक्षय लोखंडे, बंटी मोहंती, प्रमोद पाटील, सोनिया गवाणे, विजयालक्ष्मी सरकार, संतोष शर्मा, सचिन वास्कर, अनिल खोपडे यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते, क्रीडाप्रेमी नागरिक आणि खेळाडू उपस्थित होते.

खांदा कॉलनीतील फुटबॉल चषक स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, नितीन पाटील, अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, पनवेल शहर अध्यक्ष रोहित जगताप, खांदा कॉलनी अध्यक्ष अभिषेक भोपी, कामोठे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, देवांशु प्रभाळे, शुभम कांबळे, अक्षय सिंग आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, क्रीडाप्रेमी नागरिक आणि खेळाडू उपस्थित होते.






**महाड : हर घर सावरकर समिती आयोजित हर घर सावरकर अभियानाची सुरुवात रविवारी किल्ले रायगड येथे राज्याचे उद्योगमंत्री आणि रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते शिवपूजनाने करण्यात आली. त्यांनी यंदाच्या ३५०व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या तयारीचा आढावाही घेतला. या वेळी आमदार भरत गोगावले, सचिन जोशी, देवव्रत बापट, अनिल गाणव उपस्थित होते.**

# निसर्गरम्य माथेरान @ १७३

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

सह्याद्रीच्या पर्वतरांगेत एका कुशीत वसलेले रायगड जिल्ह्यातील प्रदूषणमुक्त असे अद्वितीय पर्यटनस्थळ म्हणून माथेरानचे नाव सध्यातरी जगाच्या नकाशावर प्रकाशझोतात आहे. या निसर्गरम्य ठिकाणाला रविवारी (दि. २१) तब्बल १७३ वर्षे पूर्ण झाली आहेत.



ठाण्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी सर ह्युज मॅलेट हे त्या काळी रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना चौक गावापासून त्यांना समोर दिसणारा गर्द वनराई असलेला डोंगर भावला होता. त्यामुळेच त्यांनी आपला मोर्चा या डोंगराच्या दिशेने वळविला. सध्याच्या वन ट्री हिल पॉईंट मार्गाने ते वर आले होते. इथला रमणीय निसर्ग, शुद्ध हवा, गर्द झाडी, खळखणारे झरे, निरव शांतता यामुळे मॅलेट यांनी या ठिकाणी काही दिवस मुक्काम केला. त्यानंतर त्यांनी इथे एक छोटीसी वास्तू उभारली. डोंगराळ भाग असल्याने फक्त घोडे वाहतूक करीत असत. म्हणून त्यांनी आपल्या वास्तूचे नाव द बाईक असे केले होते.

२१ मे १८५०मध्ये सर ह्युज मॅलेट यांनी माथेरानचा शोध लावला होता. त्यानंतर हळूहळू ब्रिटिशांकडे कामे करणाऱ्या पारसी लोकांनी येथे आपले बंगले उभारले. पुढे १९०५मध्ये केवळ हिल स्टेशन असल्याने या गावाला नगर परिषदेचा दर्जा देण्यात आला, तर १९०७मध्ये सर आदमजी पिरभोय आणि अब्दुल हुसेन आदमजी पिरभोय या पितापुत्राने नेरळ-माथेरान अशी मिनिट्रेन सेवा स्वखर्चाने त्या काळी (१६ लाख रुपये खर्च करून) उपलब्ध करून दिल्यामुळे इथे पर्यटकांची संख्या वाढत गेली. ती आजमितीपर्यंत वाढतच आहे.

जवळपास ६० हॉटेल्स, पाचशेपेक्षाही अधिक लॉजिंग त्याचप्रमाणे शासकीय निवासस्थाने पर्यटकांना सेवा देत आहेत. इथल्या स्थानिक लोकांच्या तीन ते चार पिढ्या आजही पर्यटनावर आधारित कामे करून आपल्या कुटुंबाची उपजीविका भागवत आहेत. अशा या पर्यटनस्थळाने १७३ वर्षे पूर्ण केली आहेत.

# उद्योग वाढीसाठी प्रयत्न करणार -मुख्यमंत्री

**पालघर : प्रतिनिधी**

उद्योग वाढले तर रोजगार वाढून रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील. उद्योगांच्या समस्या लवकरच दूर करून राज्यात उद्योग वाढीसाठी प्रयत्न करू, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. तारापूर इंडस्ट्रियल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (टीमा) सदस्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन चर्चा केली. त्या वेळी मुख्यमंत्री बोलत होते.



या वेळी आमदार राजेश पाटील, श्रीनिवास वनगा, रवींद्र फाटक, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, तारापूर इंडस्ट्रियल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे सदस्य आदी उपस्थित होते.

उद्योग वाढीसाठी जागा तसेच नवीन उद्योगासाठी जमीन व शासनाच्या विविध परवानग्या या लवकरात उपलब्ध होण्यासाठी सकारात्मक निर्णय घेऊ. बोईसर ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपालिकेमध्ये करणे याबाबतीतदेखील राज्य शासन सकारात्मक निर्णय लवकरच घेणार आहे. उद्योग वाढीसाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत. सर्व संबंधित अधिकाऱ्यासमवेत तातडीने बैठक घेऊन उद्योगांचे सर्व प्रश्न युध्दपातळीवर सोडविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निर्देश दिले.

या उद्योगांमधून लोकांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळतो. हे उद्योग वाढावेत यासाठी राज्य शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल. उद्योजकांना कोणत्याही प्रकारचा त्रास, कोणत्याही प्रकारची अडचण जिल्ह्यामध्ये होऊ नये, अशा प्रकारच्या सूचनाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्हाधिकारी गोविंद बोडक व पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांना दिल्या.

उद्योग वाढले की रोजगार वाढणार आहेत आणि स्थानिक नागरिकांना, बेरोजगार स्थानिकांना रोजगार देण्यासाठी उद्योजकांना जे-जे सहकार्य आवश्यक असेल ते सर्व सहकार्य व सुविधा उद्योगांना देण्याचे काम राज्य सरकार करेल, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी सांगितले.

# ई-रिक्षा सुरू करा; माथेरानकरांची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार माथेरान नगरपालिकेने ५ डिसेंबरला सात ई-रिक्षांसोबत पायलट प्रोजेक्टला सुरुवात केली व गावकऱ्यांनी प्रचंड मोठ्या उत्साहात स्वागत केले. विद्यार्थी पाच रुपयांत शाळेत जाऊ लागले, तर इतर नागरिक व पर्यटक ३५ रुपयांत दस्तुरी नाका, टॅक्सी स्टँड येथून बाजारपेठत व माथेरानच्या दक्षिणेच्या शेवटच्या टोकावर वन ट्री हिल परिसरात राहणारे रहिवासी घरापर्यंत जाऊ शकले, मात्र सनियंत्रण समितीने तीन महिने पूर्ण होताच ई-रिक्षा बंद केल्या व सुप्रीम कोर्टाच्या पुढील आदेशापर्यंत वाट पाहण्यास सांगितले. ही सेवा सुरू करण्याची मागणी माथेरानकर करीत आहेत.



ब्रिटिश काळापासून माथेरानला वाहन बंदी असल्याने घोडे व हातरिक्षांचा वापर अंतर्गत वाहतुकीसाठी केला जातो. हातरिक्षा ही एक अमान्य प्रथा असल्याने या रिक्षाचालकांना पर्यावरणपोषक अशा ई-रिक्षाची परवानगी मिळावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे यांनी सुप्रीम कोर्टामध्ये याचिका दाखल केली होती. कोर्टाने १२ मे २०२२ रोजी हातरिक्षा ही अमानवीय प्रथा अद्याप सुरू असल्याबद्दल नाराजी व्यक्त केली होती. याचिकाकर्ते शिंदे यांच्या मते राज्य शासनाचे वकील राहुल चिटणीस यांनी कोर्टाला स्पष्ट सांगितले की या हातरिक्षाचालकांना ई-रिक्षा देण्याची राज्य शासनाची तयारी आहे. ई-रिक्षाचा समावेश इको सेन्सेटिव्ह झोनच्या अधिसूचनेत सामावेश करावा लागेल. त्याचप्रमाणे माथेरानच्या रस्त्यावर कोणत्या मॉडेलची ई-रिक्षा धावू शकते. याची चाचणी करण्यासाठी तीन महिन्यांच्या पायलेट प्रोजेक्टची मागणी केली होती. राज्य शासनाची ही मागणी सुप्रीम कोर्टाने मान्य केली. नगरपालिकेने महिंद्रा कंपनीच्या सात ई-रिक्षासोबत यशस्वीरीत्या पूर्ण केला. तत्कालीन मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी १३ मार्च रोजी पायलट प्रोजेक्टचा रिपोर्ट कोर्ट सनियंत्रण समितीला सादर केला.

दरम्यान, घोडेवाल्यांनी ई-रिक्षाविरोधात सुप्रीम कोर्टात धाव घेतली त्यांच्या याचिकेवर २४ फेब्रुवारी रोजी सुनावणी झाली. न्यायाधीश बी. आर. गवई व विक्रम नाथ यांनी आदेशात स्पष्ट केले आहे की, नागरिकांच्या वाहतुकीची समाश्या सुटली पाहिजे. दगड मातीच्या रस्त्यावर हातरिक्षा चालू शकते तर ई-रिक्षासुद्धा चालली पाहिजे. नाहीतर जंगलात वापरण्यात येणाऱ्या जिप्सी गाड्यांचादेखील विचार केला जाऊ शकतो.

ब्लॉकच्या रस्त्यांमुळे येथील सौंदर्याला बाधा येते का याची चाचपणी करणे आवश्यक असल्याने क्ले ब्लॉकच्या रस्त्यांच्या कामाला कोर्टाने स्थगिती दिली व या विषयावर निर्णय घेण्यास सनियंत्रण समिती सक्षम असल्याने २४ एप्रिलपर्यंत कोर्टाला अहवाल सादर करण्याचे आदेश समितीला दिले होते. अडीच महिने झाले तरी सनियंत्रण समितीने अद्याप कोर्टाला पायलट प्रोजेक्टचा अहवाला सादर केला नाही.

**पायलट प्रोजेक्टनंतर ई-रिक्षा बंद करण्यात याव्या असे कोर्टाच्या कोणत्याही आदेशात नमूद केले नाही. वाहतूक ही अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने कोर्टाचे पुढील आदेश येईपर्यंत तरी सात ई-रिक्षा सुरू ठेवायला पाहिजे होत्या.**

**-अरविंद शेलार, ज्येष्ठ नागरिक**

**तीन महिन्यांच्या पायलट प्रोजेक्टदरम्यान दोन लाख पर्यटकांनी माथेरानला भेट दिली. ई-रिक्षेमुळे पर्यटनात क्रांती होऊ शकते याचा फायदा अश्वचलकांनादेखील होणार आहे.**

**-आकाश चौधरी, माजी उपनगराध्यक्ष**

**ई-रिक्षा या हातरिक्षाचालकांना चालवण्यास मिळाल्या पाहिजेत ही महत्त्वपूर्ण मागणी केली आहे. या चालकांची अमानवीय प्रथेतून मुक्ती व्हावी यासाठी याचिका दाखल केली आहे. तसे आश्वासन राज्य सरकारने कोर्टाला दिले आहे.**

**-शकील पटेल, अध्यक्ष, श्रमिक रिक्षा संघटना**

# महावितरण अभियंता तरुणीची आत्महत्या

## गोरेगावमधील घटना

**माणगाव : रामप्रहर वृत्त**

गोरेगाव येथील महावितरण कार्यालयात नोकरीला असलेल्या २८ वर्षीय तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. अभिलाषा अभिमन्यू शेळके (वय २८, रा. मूळ औरंगाबाद) असे या आत्महत्या केलेल्या युवतीचे नाव आहे.

गेले जवळपास तीन ते चार वर्षापासून अभिलाषा ही गोरेगाव येथील महावितरण कार्यालयात कार्यरत होती. दरम्यान, आत्महत्येच्या आधी



या तरुणीने एक चिठ्ठीदेखील लिहिली असून ती गोरेगाव पोलिसांनी जप्त केली आहे. माझ्या आत्महत्येला कोणालाही जबाबदार धरु नये. हा निर्णय मी स्वतः हून घेतला आहे, असे तिने आपल्या आई-वडिलांच्या नावाने लिहिलेल्या चिठ्ठीत म्हटले आहे.

मृत अभिलाषा शेळके गोरेगाव येथील कनिष्ठ अभियंता या पदावर कार्यरत होती. महावितरणच्या गोरेगाव येथील वसाहतीत ही युवती एकटीच राहत होती. राहत असलेल्या ठिकाणी शुक्रवारी १९ मे रोजी अभिलाशा हिने ओढणीने गळफास घेत आत्महत्या केली. गोरेगाव पोलीस ठाणे येथे आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या सगळ्या प्रकरणाचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नावले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार उभारे करीत आहेत.

# कर्नाटकमध्ये गारांसह मुसळधार पाऊस

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

कर्नाटकची राजधानी बंगळुरूसह रविवारी (दि. २१) दुपारी अनेक भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली. बंगळुरूतील पावसामुळे रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचले.

बंगळुरूमध्ये अचानक ढग दाटून आले आणि मुसळधार पाऊस पडला, यादरम्यान अनेक ठिकाणाहून गारपिटीच्या बातम्या आल्या आहेत. हवामान खात्याने याआधीच येथे मुसळधार पावसाचा इशारा दिला होता.



जोरदार वारा आणि पावसामुळे बंगळुरूमध्ये अनेक ठिकाणी झाडे पडल्याने नुकसान झाले आहे. एएनआय या वृत्तसंस्थेने आपत्तीग्रस्त भागांची छायाचित्रे प्रसिद्ध केली आहेत, ज्यात रस्त्यावर पडलेली झाडे दिसतात.

# तळोजे येथून दोन लाखांचा गुटखा जप्त

**पनवेल : वार्ताहर**

तळोजे येथे भाड्याच्या घरामध्ये गुटख्याची साठवणूक करणाऱ्या व्यक्तीला गुन्हे शाखा पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून तळोजा पोलिसांनी दोन लाखांचा गुटखा जप्त केला आहे.

तळोजामधील पेठाली गावात उमेश कमटी (वय २५) याने घर भाड्याने घेऊन त्या ठिकाणाहून गुटख्याचा साठा व पुरवठा होत असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यावरून गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त दीपक साकोरे यांच्या मार्गदर्शनाखाली अमली पदार्थविरोधी पथकाने पेठाली गावात छापा टाकला. या वेळी उमेश कमटी याच्या घराची झडती घेतली असता त्यामध्ये घरात गोण्यांमध्ये साठवणूक केलेला सुमारे दोन लाख रुपये किमतीचा गुटखा आढळला. शिवाय त्याच्याकडून परिसरातील गुटखा विक्रेत्यांना त्याचा पुरवठादेखील केला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

# मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर वीकेंडच्या वाहतूक कोंडीवर उपाय

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरून प्रवास करणाऱ्यांसाठी मोठी अपडेट समोर आली आहे. महामार्ग सुरक्षा नियंत्रक पथकाने महामार्गावरील वाहतूक अमृतांजन ब्रिज आणि मजिक पॉईंटच्या पलीकडील पुण्याकडे जाणारी वाहतूक मुंबईकडे येणाऱ्या मार्गावर वळवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय आठवड्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच शनिवारी रविवारी लागू करण्यात येईल किंवा मोठ्या सुट्ट्यांच्या कालावधीमध्ये हा निर्णय वाहतूक सुरळीत व्हावी म्हणून लागू करण्यात येईल.

ठाणे पोलिसांनी जड वाहनांद्वारे होणाऱ्या वाहतुकीवर १ मार्चपासून निर्बंध घातले आहेत. १ मार्चपासून मुंब्रा बायपासवरुन प्रवास करण्यास पहाटे ५ ते रात्री ११च्या वेळी जडवाहतूक करणाऱ्या वाहनांवर बंदी घालण्यात आली आहे. हाच निर्णय १९ एप्रिलपासून संकेत आणि कळवा खारेगाव पुलाच्या कामामुळे तिथेदेखील लागू करण्यात आला आहे. या निर्णयामुळे मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर वाहतूक कोंडी होण्यास सुरुवात झाली. त्यामुळे जड वाहतूक करणाऱ्या वाहनांना खालापूरजवळच्या सावरोली टोलनाक्याजवळ पुण्याकडे जाणाऱ्या मार्गावर थांबण्यास सांगण्यात आले.

हायवे सिक्युरिटी पेट्रोलिंगच्या बोरघाट विभागाचे पोलीस निरीक्षक मंगेश चव्हाण यांनी याबाबत माहिती दिली. खंडाळा बोगदा ते बोरघाट भागातील वाहतूक मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावरुन वळवण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. याबाबतचा निर्णय हा परिस्थिती पाहून घेतला जाईल, असेही ते म्हणाले.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून शनिवारी आणि रविवारी एक्स्प्रेस वेवरुन मुंबईहून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर वाहतूक कोंडी होत होती. एक्स्प्रेस वेवरील वाहतूक कोंडी कमी करण्याचा प्रयत्न पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# 'महाप्रित'चा कर्करोगाच्या उपचारासाठी 'समीर'सोबत करार

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय प्रौद्योगिकी संस्था, मुंबई येथे आयोजिलेल्या रेडिओलॉजी व रेडिओथेरपी प्रगती-२०२३ या परिषदेत महाप्रित (महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित व समीर (Society for -pplied Microwave Electronics Engineering and Research) यांच्यासोबत रेडिओलॉजी आणि रेडिओ थेरपी तंत्रज्ञानावर आधारित कर्करोगावर उपचार



करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला.

या सामंजस्य कराराच्या वेळी महाप्रितचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक बिपीन श्रीमाळी व समीर संस्थेचे सुनिता वर्मा तसेच महाप्रित कंपनीचे अधिकारी उपस्थित होते.

या वेळी श्रीमाळी म्हणाले, भारताची लोकसंख्या लक्षात घेता कर्करोगासारख्या असाध्य रोगावर रेडिओथेरपी व रेडिओलॉजीच्या तंत्रज्ञानामुळे या रोगावर उपचार करण्यासाठी मदत होईल. हे तंत्रज्ञान सर्वसामान्य जनतेला कमी खर्चात उपलब्ध होण्यास मदत होईल तसेच महाराष्ट्रामध्ये या तंत्रज्ञानावर आधारित मोठ्या प्रमाणात सुविधा निर्माण होऊन उद्योग निर्मितीला चालना मिळेल व त्याद्वारे महाराष्ट्रात रोजगारनिर्मिती होईल.

सुनिता वर्मा म्हणाल्या, या करारामुळे समीर संस्थेमार्फत रेडिओलॉजी व रेडिओथेरपी संशोधन व तंत्रज्ञानाची कर्करोगावर उपचार घेण्यासाठी मदत होईल. महाप्रिततर्फे हे तंत्रज्ञान महाराष्ट्रात वापरण्यात येईल. महाराष्ट्रामध्ये पायाभूत सुविधा निर्माण होतील व त्यामुळे भारताला आत्मनिर्भर बनविण्यासाठी मदत होईल.

या वेळी समीर व महाप्रित तसेच भारतीय प्रौद्योगिकी संस्था, मुंबईचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पान १ वरून

# स्वच्छता अभियान लोकचळवळ व्हावी

भारताला जी-२० परिषदेचे यजमानपद मिळणे ही अभिमानाची बाब आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या देशाचे नाव उज्वल केले आहे. देशाची अर्थव्यवस्था ११व्या क्रमांकावरुन पाचव्या क्रमांकावर आणण्याचे मोठे काम त्यांनी केले आहे. ही गर्वाची बाब आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली आम्ही काम करीत आहोत. राज्य शासनाला केंद्र सरकारचे सहकार्य नेहमी मिळत आहे. त्यातून राज्याला विकासाकडे नेण्याचा प्रयत्न राज्य शासन करीत आहे, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी स्वच्छता मोहिमांसारख्या उपक्रमांची गरज आहे. स्वच्छतेसाठी प्रत्येकाने आपल्या जीवनातला एक मिनिट वेळ दिला पाहिजे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होईल आणि ऱ्हास कमी होईल. ग्लोबल वॉर्मिंग आणि वातारणातील बदलामुळे भेडसावणाऱ्या समस्यांपासून दिलासाही मिळेल, असेही मुख्यमंत्र्यांनी यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना सांगितले.

# शेतकऱ्यांसाठी अनोखी सलोखा योजना

आर्थिक सक्षमीकरणाच्या दृष्टीने राबविण्यात आलेल्या योजनांचा एकाच छताखाली लाभ, शासकीय निर्धारित शुल्कात २०० हून अधिक योजनांचा लाभ मिळण्यासाठी कमीतकमी कागदपत्रे सादर करुन जलद मंजुरी हे सर्व शासन आपल्या दारी या लोकाभिमुख अभियानामुळे शक्य होणार आहे. या अभियानाच्या माध्यमातून प्रत्येकाला शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्यात येणार आहे.



राज्यातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, महिला, विद्यार्थी यांचे प्रश्न त्वरित निकाली काढण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून शासन आपल्या दारी हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश हा शासनाच्या योजनांचा, उपक्रमांचा लाभ सर्वसामान्यांना त्वरित मिळावा हाच आहे. हे अभियान प्रत्येक जिल्ह्यात राबविण्यात येत असून यामध्ये प्रत्येक जिल्ह्यात ७५ हजार लाभार्थ्यांना एकाच छताखाली लाभ मिळणार आहे. या अभियानांतर्गत 'सलोखा योजनेचा' लाभ सर्वसामान्य जनतेने घ्यावा. शेतजमिनीच्या ताब्यावरुन होणारे वाद मिटवण्यासाठी, जमिनाच्या हिस्स्यावरुन कायमचे तुटलेले नातेसंबंध पुन्हा जोडण्यासाठी सलोखा योजना महत्त्वाची भुमिका बजावत आहे.

शेतजमिनीचा ताबा आणि वहिवाटीबाबत शेतकऱ्यांचे आपापसांतील वाद मिटविण्यासाठी एका शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा दुसऱ्या शेतकऱ्याकडे, दुसऱ्या शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे असणाऱ्या शेतजमीन धारकांचे क्षेत्र अदलाबदल करण्यासाठी शासनामार्फत सलोखा योजना राबविण्यात येत आहे. यासाठी नोंदविण्यात येणाऱ्या दस्तांसाठी मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क प्रत्येकी केवळ एक हजार रुपये शेतकऱ्यांना भरावे लागणार आहे.

राज्यात जमिनीच्या वादाबाबतची कोट्यवधी प्रकरणे विविध न्यायालयांमध्ये वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. त्यामध्ये मुख्यतः मालकी हक्काबाबतचे वाद, शेत बांधावरून होणारे वाद, जमिनीच्या ताब्याबाबतचे वाद, रस्त्याचे वाद, शेत जमीन मोजणीवरून होणारे वाद, अधिकार अभिलेखातील चुकीच्या नोंदीमुळे होणारे वाद, शेतीवरील अतिक्रमणावरून होणारे वाद, शेती वहीवाटीचे वाद, भावा-भावांतील वाटणीचे वाद, शासकीय योजेनेतील त्रुटी किंवा प्रस्ताव अमान्यतेबाबतचे वाद इत्यादी कारणांमुळे शेतजमिनीचे वाद आहेत. शेतजमिनीचे वाद अत्यंत क्लिष्ट स्वरुपाचे व गुंतागुंतीचे असल्याने न्यायालय आणि प्रशासनातील पुरेशा यंत्रणेअभावी हे वाद वर्षानुवर्षे चालू आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर वाद संपुष्टात येण्यासाठी शासनाने सलोखा योजनेला मान्यता दिली आहे.

सलोखा योजनेचा लाभ घेण्यासाठी योजनेच्या अटी शर्तींचे पालन होणे आवश्यक आहे. ही योजना दोन वर्षांसाठी असेल. शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे किमान १२ वर्षांपासून असला पाहिजे. अकृषिक, रहिवासी तसेच वाणिज्यिक वापराच्या जमिनींसाठी ही योजना लागू नाही. दोन्ही पक्षकारांनी सर्वसंमतीने हा अदलाबदल दस्त नोंदवित आहे, अशा प्रकारची अट दस्तामध्ये समाविष्ट करणे आवश्यक. सलोखा योजनेअंतर्गत पंचनाम्यासाठी गावातील तलाठी यांच्याकडे अर्ज करणे आवश्यक आहे. पंचनामा प्रमाणपत्रासाठी तलाठी यांच्याकडे साध्या कागदावर अर्ज करता येईल. सलोखा योजनेमध्ये जमिनीच्या पंचनाम्याच्या वेळेस कमीत कमी दोन सज्ञान व्यक्तींची पंचनामा नोंदवहीमध्ये सही आवश्यक आहे. त्यात दोन्ही शेतकऱ्यांचे सर्व्हे नंबर तसेच चतु:सीमा गट नंबरचा उल्लेख करावा. शेतकऱ्याने अर्ज केल्यानंतर तलाठी कर्मचाऱ्याने सर्वसाधारणपणे १५ दिवसांमध्ये पंचनामा करणे आवश्यक आहे. वस्तुस्थितीदर्शक पंचनामा मंडळ अधिकारी, तलाठी यांनी नोंदवून पंचनामा प्रमाणपत्र शेतकऱ्यांना दिले जाईल. पंचनामा प्रमाणपत्र अदलाबदल दस्तास जोडणे आवश्यक राहील. दस्ताची नोंदणी करताना दोन्ही गटातील सगळ्या सहभागी शेतकऱ्यांची दस्त नोंदणीस संमती लागेल. ती नसल्यास अशी अदलाबदल नोंदणीकृत होणार नाही. सलोखा योजना ही पुढील दोन वर्षांसाठी लागू असेल, म्हणजे दस्तांची अदलाबदल करण्यासाठी जी सवलत मिळत आहे, ती पुढील दोन वर्षांपर्यंत असेल. सलोखा योजना अंमलात येण्यापूर्वी काही शेतकऱ्यांनी जमिनीची अदलाबदल केली असेल, किंवा त्यासाठी जे काही मुद्रांक शुल्क व नोंदण फी अगोदरच भरली असेल, त्याचा परतावा मिळणार नाही.

नागरिकांना व विद्यार्थ्यांना विविध कामांसाठीचे लागणारे आवश्यक दाखले व सेवा एकाच छताखाली 'शासन आपल्या दारी' शिबिराच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहेत. नागरिक व विद्यार्थी यांना शैक्षणिक दाखले, जात प्रमाणपत्र, रेशन कार्ड, उत्पन्न दाखला, आधार कार्ड, आधिवास प्रमाणपत्र, पॅनकार्ड असे अनेक दाखले व सेवा प्राप्त करून घेण्यासाठी विविध कार्यालयांना जावे लागते व अनंत अडचणी येत असतात, परंतु शासन आपल्या दारी या उपक्रमाअंतर्गत सर्व संबंधित शासकीय यंत्रणा व अधिकारी उपस्थित राहणार असून त्याच ठिकाणी सर्व सेवा व सुविधा नागरिकांना मिळणार आहे. खेड्यापाड्यातील नागरिकांना माहितीच्या अभावी वारंवार विविध कार्यालयांना ये -जा करावी लागते. बऱ्याचदा आवश्यक कागदपत्र त्यांच्याकडे नसतात. त्यामुळे शासन आपल्या दारी या उपक्रमाच्या माध्यमातून शासकीय यंत्रणाच आपल्या घरा-दारापर्यंत उपस्थित झालेली आहे.

शासन आपल्या दारी या उपक्रमाला यशस्वी करण्यासाठी कोकण विभागातील सर्व शासकीय यंत्रणा सज्ज झाल्या आहेत. नागरिक, विद्यार्थी, शेतकरी, लघुउद्योजक समाजातील अशा प्रत्येक वर्गाला शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या त्यांच्यासाठी लाभदायक असणाऱ्या योजनांचा सुकर मार्गाने मोठया प्रमाणात लाभ व्हावा हेच ध्येय ठेवून शासन आपल्या दारी हा लोकाभिमुख उपक्रम यशस्वी करुया.

**-प्रवीण डोंगरदिवे**
**उपसंपादक विभागीय माहिती कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई.**

## निवडक

### कामोठे येथून विवाहिता बेपत्ता

**पनवेल :** कामोठे गाव येथून एक ४० वर्षीय विवाहिता बेपत्ता झाल्याने ती हरवल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. किसमानी देवी अशोक सिंग असे या विवाहितेचे नाव असून तिची उंची पाच फूट दोन इंच, रंग गोरा, नाक सरळ, डोळे काळे, केस काळे, चेहरा उभट, अंगाने सडपातळ आहे. तसेच तिने अंगात लाल साडी, कानात डुल, नाकात नथ व गळ्यात मंगळसूत्र घातले आहे. या महिलेबद्दल कोणास काही माहिती असल्यास कामोठे पोलीस ठाणे (०२२-२७४६१४३१) किंवा पोलीस हवालदार हिरालाल शेलार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



### करंजाडेतून देशी दारू जप्त

**पनवेल :** तालुक्यातील करंजाडे वसाहतीमध्ये विनापरवाना देशी दारूची विक्री करणाऱ्या व्यक्तीवर पनवेल शहर पोलिसांनी कारवाई करीत दारूच्या बाटल्या जप्त केल्या. करंजाडे सेक्टर २ येथील मंदिराजवळील टपरीमध्ये एक व्यक्ती देशी दारूची विक्री करत असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तपासणी केली असता या व्यक्तीकडे देशी दारूच्या बाटल्यांसह आढळून आला. पनवेल शहर पोलिसांनी त्याच्याविरुद्ध कारवाई करत ३५० रुपये किमतीच्या दारूच्या बाटल्या जप्त केल्या आहेत.

### उलवे येथून तरुणी बेपत्ता

**पनवेल :** तालुक्यातील उलवे येथून एक २५ वर्षीय तरुणी आपल्या नातेवाईकाच्या घरातून कोणासही काहीएक न सांगता कोठेतरी निघुन गेल्याने ती हरवल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. मूळची वाशीम येथील असलेली रचना अर्जुन खिल्लारे ही तरुणी आपल्या नातेवाईकाच्या उलवे सेक्टर २५ येथील घरातून कोणासही काही एक न सांगता कोठेतरी निघुन गेली आहे. तिची उंची १६२ सेंमी, अंगाने मध्यम, केस काळे असून तिने अंगात पांढरा शर्ट व निळी पॅन्ट तसेच पायात चप्पल घातली आहे. या तरुणीबाबत कोणास काही माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस हवालदार संदेश पाटील यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



# मीठ उत्पादन व्यवसाय संकटात

## बदलत्या वातावरणाचा विपरित परिणाम

**उरण : रामप्रहर वृत्त**

सातत्याने बदलणाऱ्या वातावरणामुळे पारंपरिक मीठ उद्योगही संकटात आला आहे. त्याच्या उत्पादनावर ही परिणाम झाला आहे. त्यामुळे मीठ तयार होण्यासाठी १५ऐवजी यामध्ये वाढ होऊन हा कालावधी ३० दिवसांवर पोहचला आहे. परिणामी मीठ उत्पादकांवर आर्थिक संकट ओढवले आहे.

उरण तसेच रायगड जिल्ह्यातील किनारपट्टीवर मिठागरे हा मोठा व्यवसाय होता, मात्र जिल्ह्यातील वाढत्या औद्योगिक क्षेत्रामुळे मीठ व्ययसाय कमी होऊ लागला आहे. यामध्ये उरण तालुका हा मीठ उत्पादक म्हणून अग्रेसर ठिकाण होते.



येथून रेल्वेच्या माल गाडीने मीठाची वाहतूक मोठ्या प्रमाणात केली जात होती. उरणमध्ये मिठागर कामगार व मालक यांची ही संख्या अधिक आहे.

उरण परिसरात पारंपरिक मीठ उत्पादन करणारी मिठागरे सुरू असून मीठ उत्पादन केले जाते. हे मीठ तयार करण्यासाठी लागणारे समुद्राचे पाणी भरतीच्या वेळी साठवणूक तलावात घ्यावे लागते, मात्र सततच्या बदलत्या वातावरण आणि पर्यावरणावर होणारा परिणाम व मातीच्या भरावामुळे मिठासाठी लागणारे पाणी मिळत नसल्याचे मत मीठ उत्पादक किशोर म्हात्रे यांनी दिली तसेच मीठ उत्पादनासाठी लागणाऱ्या पाण्याच्या क्षाराचे प्रमाण आणि तपमान याचा मेल होत नसल्याने मीठ उत्पादसाठीच्या कालावधीत वाढ झाली आहे. त्यामुळे मीठ उत्पादकांचे नुकसान होऊ लागले आहे.

**दरही घसरले**

**पर्यावरणातील बदलामुळे मीठ उत्पादनावर परिणाम झाल्याने मिठाचे दर ही कमी झाले आहेत. सध्या एक रुपये किलोने मिठाची विक्री करावी लागत आहे.**

### कामोठे येथे दुचाकींच्या अपघातात दाम्पत्य जखमी

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे टोलनाका येथील कामोठे ब्रिजवर पाठीमागून येणाऱ्या मोटरसायकलची स्कूटीला जोरदार ठोकर बसली. यामध्ये पती-पत्नी गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात मोटारसायकल स्वाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आकुर्ली येथे राहणारे विजय बबन साळुंखे हे चेंबूर इथून घरी येण्यासाठी स्कूटीवर निघाले. ते कामोठे टोलनाकासमोरील कामोठे ब्रिजवर आले असता त्यांच्या पाठीमागून येणाऱ्या मोटरसायकल (एमएच ४६ सीबी ५४२७) वरील चालकाची त्यांना जोरात ठोकर बसली. या ठोकरमध्ये विजय साळुंखे व त्यांची पत्नी रस्त्यावर पडले. यात साळुंखे यांच्या डाव्या गुडघ्याला दुखापत झाली व त्यांच्या पत्नीला तोंडाला, पायाला, डोक्याला दुखापती झाल्या. अपघातानंतर त्यांना एमजीएम हॉस्पिटल येथे उपचाराकरिता दाखल करण्यात आले आहे. याबाबत कळंबोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### कळंबोलीत दुर्गंधीयुक्त पाणी रस्त्यावर

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली सेक्टर ३ येथील एलआयजी जे आणि के विभागातील मलवाहिनीचे चेंबर वारंवार तुंबत आहेत. चेंबर तुंबल्यामुळे दुर्गंधीयुक्त पाणी रस्त्यावर वाहत असल्यामुळे या भागातील नागरिकांची गैरसोय झालेली आहे. वारंवार समस्या उद्भवत असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

पनवेल महापालिकेला निवेदन देऊन ही समस्या सोडविण्याची मागणी जे अँड के ओनर्स असोसिएशनने केली आहे. जे आणि के एलआयजीत राहणाऱ्या नागरिकांना अनेक दिवसांपासून याचा त्रास होतो आहे. १ ते २० आणि ६१ ते ८० या घरक्रमांकासमोर असलेली मेन लाईन चोकअप झालेली आहे. यावर किरकोळ दुरुस्ती केली जाते. परंतु, पुन्हा काही दिवसांतच जैसे थे परिस्थिती होऊन लाईन चोकअप होत आहे.

### 'पाताळगंगे'ला प्रदूषणाचा विळखा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा परिसरातील वाढत्या औद्योगिकीकरणामुळे प्रदुषणाला सामोरे जावे लागत असून औद्योगिकीकरणामुळे स्थानिक नेत्यांनी आपलाच फायदा करत स्थानिकांचे, प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न आजही सुटलेले नसल्याचे दिसत आहे.

रसायनी पाताळगंगा परिसरातील जमिनींचे भाव गगनाला भिडले आहेत. त्यामुळे येथे जमीन खरेदी व्यवहार जोरात असल्याचे दिसून येतात. याअगोदर जमिनी गेलेल्या स्थानिक प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्याचे आश्वासन दिले असले तरी आजही अनेकांना आपल्या न्यायहक्कासाठी लढावे लागत आहे. त्यातच कारखानदारांनी शासनाचे सर्व नियम धाब्यावर बसवल्याने प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे.

### पनवेलमध्ये वारांगनांवर पोलिसांची कारवाई

#### माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या मागणीची दखल

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी शहरात वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांवर कारवाई करण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत पनवेल शहरातील रोज बाजार, बसस्थानक, रेल्वे स्टेशन, लॉज तसेच सार्वजनिक ठिकाणी अवैध देह व्यवसाय व अश्लील हावभाव करणाऱ्या वारांगनांवर पनवेल शहर पोलिसांची धडक कारवाई सुरू केली.



पनवेल शहर तसेच तालुक्यातील लोकवस्ती मोठ्या प्रमाणात वाढू लागली आहे. त्यामुळे काही गावांमध्ये लोकवस्ती वाढत असताना वेश्यांची वस्तीदेखील वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे. पनवेल शहरात खुलेआम वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिला फिरत आहेत. शहराच्या रोज बाजार, बस स्थानक, रेल्वे स्टेशन, विविध लॉज तसेच सार्वजनिक ठिकाणांसह अनेक गजबजलेल्या भागांत या वेश्या उघडपणे रस्त्यावर गिन्हाईक शोधत उभ्या असतात. यामुळे सर्वसामान्यांची मोठी कुचंबणा होत आहे. त्याचप्रमाणे याभागातून जाताना सर्वसामान्य महिलांना मान खाली घालून जावे लागत आहे. बसस्थानक परिसरात या वेश्या आपला सावज हेरत असतात तर पटवर्धन रुग्णालयासमोरील मोकळ्या जागेत वेश्या व्यवसाय खुलेआम सुरू आहे. अश्लील हावभाव करून ग्राहकांना आकर्षित केले जाते. त्यामुळे वेश्या व्यवसायाचे जाळे पसरत चालले असल्याचे निदर्शनास येताच माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी पोलिसांकडे कारवाईची मागणी केली होती.

याची दखल घेत पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलिसांच्या पथकाने सलग दोन दिवस सार्वजनिक ठिकाणांसह अनेक गजबजलेल्या भागांत जाऊन या वारांगनांवर कारवाई केली. या कारवाईचे पनवेलकरांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

### बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन

#### रामशेठ ठाकूर महाविद्यालयात उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात मंगळवारी (दि. २३) सकाळी ११ वाजता इयत्ता बारावीनंतर वाणिज्य व शास्त्र शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये असणाऱ्या करिअरच्या संधी या विषयावर करियर मार्गदर्शनाचे आयोजन केले आहे.

या करिअर मार्गदर्शनासाठी प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड हे प्रमुख वक्ते म्हणून वाणिज्य व शास्त्र शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना इयत्ता बारावीनंतर कोणत्या क्षेत्रामध्ये करिअर करायचे तसेच कोणत्या क्षेत्रामध्ये करिअरसाठी खूप संधी आहेत याविषयी मोलाचे मार्गदर्शन करणार आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी इयत्ता बारावी झालेल्या वाणिज्य व शास्त्र शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना या करिअर मार्गदर्शनाचा लाभ घेण्याची विनंती केली आहे.

या करिअर मार्गदर्शनाचे आयोजन प्रा. महेश धायगुडे (समन्वयक प्रवेश समिती) यांनी केले आहे तसेच प्रा. प्रथमेश उदेकर, प्रा. तनुजा सुमन, प्रा. सफिना मुकादम, प्रा. डॉ. फारुख शेख प्रा. विशाल देशमुख हे सर्वजण करिअर मार्गदर्शन यशस्वी होण्यासाठी मेहनत घेत आहेत.

दरम्यान, या महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीकोनातून नेहमीच विविध उपक्रम राबविण्यात येत असतात.

### कळंबोली शहरात पाण्याच्या मीटरची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली शहरात सिडकोमार्फत बसवण्यात आलेले पाण्याचे मीटर चोरी होण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे. या प्रकारामुळे नागरिकांना मानसिक त्रासासह आर्थिक भुर्दंडाला सामोरे जावे लागत आहे. पाण्याचे मीटर चोरी होत असल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यातदेखील करण्यात आलेली आहे.

कळंबोली शहरात सिडकोमार्फत बसवण्यात आलेले पाण्याचे मीटर चोरी होण्याच्या घटना घडत आहे. या चोरी झालेल्या मीटरच्या बदल्यात नवीन मीटर बसवण्यासाठी दोन ते तीन हजार रुपयांची रक्कम भरून मीटर प्राप्त करून घ्या, असे सिडको पाणीपुरवठा विभागाकडून सांगण्यात येत आहे. या प्रकारामुळे नागरिकांना मानसिक त्रासासह आर्थिक भुर्दंडाला सामोरे जावे लागत आहे.

याप्रकरणी पाण्याचे मीटर चोरी होत असल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यातदेखील करण्यात आलेली आहे. त्यामुळे या प्रकाराला आळा घालणार कसा तसेच या प्रकाराला सर्वस्व जबाबदार कोण, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी न्हावे गावचे माजी सरपंच चंद्रकांत भोईर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या वेळी विद्यमान सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे यांच्यासह भोईर परिवार उपस्थित होता.**

### आंब्यांचे दर घसरले! सर्वसामान्यांच्या आवाक्यात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वातावरणातील उष्मा वाढत आहे. त्यामुळे फळे लवकर तयार होत आहेत. याच पार्श्वभूमीवर बाजारात आंब्यांची आवकही वाढत आहे. परिणामी बाजारात सर्वच ठिकाणांच्या आंब्यांचे दर घसरले आहेत. अगदी हापूस आंब्यापासून दक्षिण भारत, गुजरातकडील आंब्यांचे दरही कमी झाले. त्यामुळे खवय्यांना मनसोक्त आंब्याचा आस्वाद घेता येणार आहे.

यावर्षी लहरी हवामानाचा फटका बसल्याने, सर्वच ठिकाणांच्या आंब्याला मोठा फटका बसला होता. त्यामुळे बाजारात आंबा तुलनेने कमीच होता. त्यातही कोकणातील हापूस आंब्याचे उत्पादन १७ ते १८ टक्क्यांवर आले. या आंब्याचे दर एक हजार रुपये डझनच्या घरात गेले होते. हापूस कमी प्रमाणात असल्याने, त्याला पर्याय म्हणून हापूससारख्या दिसणाऱ्या कर्नाटकी आंब्यांकडे ग्राहकांनी मोर्चा वळवला होता. त्याचपाठोपाठ इतर जातींच्या म्हणजेच बदामी, केसर, लालबाग, तोतापुरी या आंब्यांकडे ग्राहकांचा कल होता. त्यामुळे या आंब्यांच्या दरातही वाढ झाली होती. म्हणूनच एप्रिल आणि मे महिन्याची सुरुवात या आंब्याच्या मुख्य हंगामाच्या काळातही आंबा खरेदी करण्यास ग्राहक फारसे उत्सुक नव्हते.

आता १० मेपासून सर्वच ठिकाणांच्या आंब्यांची आवक बाजारात वाढू लागली आहे. यात प्रामुख्याने कोकणातील हापूस आंब्यांची आवक वाढली आहे. त्यामुळे हापूसचे दर कमी झाले असून, त्यांच्यापाठोपाठ इतर आंब्यांच्या दरात घसरण झाली आहे. आंबा आता सर्वसामान्यांच्या आवाक्यात आला आहे. हापूस आंब्यांपाठोपाठ कर्नाटकी आंबे, दक्षिण भारतातून बदामी, लालबाग, तोतापुरी आंबे येत आहेत. गुजरातवरून केसर आंब्याची आवक वाढायला सुरुवात झाली आहे. या सर्वांचे दर नियंत्रणात आले आहेत. हा आंब्यांचा मुख्य हंगाम असून त्याला मागणी चांगली आहे.



| आत्ताचे घाऊक दर | पूर्वीचे दर |
|---|---|
| हापूस आंबा - ५०० ते १००० रु. | डझन १००० ते १२०० रु. |
| कर्नाटक आंबे ५० रु ते १०० रु. | किलो ८० ते १५० रु. |
| बदामी ३० ते ८० रु. | किलो ७० ते १२० रु. |
| लालबाग - ३० ते ५० रु. | किलो ५० ते १०० रु. |
| केसर - ५० ते १०० रु. | किलो ८० ते १२० रु. |
| तोतापुरी - ३० ते ६० रु. | किलो ५० ते ७० रु. |

**आता सर्वच आंबे चांगल्या प्रमाणात येत आहेत. त्यामुळे आंब्यांचे दर कमी झाले आहेत. सर्वांना आंब्यांचा आस्वाद घेता येणार आहे.**

**-संजय पानसरे, संचालक, फळ बाजार**

### रानसई धरणातील जलसाठ्यात घट

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील एमआयडीसीच्या रानसई धरणातील जलसाठ्यात घट झाली असून २० जूनपर्यंत पुरेल एवढाच पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. त्यामुळे नागरिकांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन एमआयडीसीकडून करण्यात येत आहे.

रानसई धरणाची पाण्याची पातळी संध्या अत्यंत खालावली असून धरणात फक्त ९१.०८ फुट एवढेच पाणी शिल्लक आहे. हे पाणी संपल्यानंतर उरणकरांना मृत(राखीव) साठ्यातून पाणी पुरवठा केला जाणार आहे. या मृत साठ्यातील पाणी आणखी १५ दिवस पुरू शकते. त्यामुळे नागरिकांनी पाणी जपून वापरण्याचे आवाहन करण्यात येत आहे.



उरण तालुक्याला रोज ३५ एमलडी पाण्याची गरज लागते. त्यापैकी तीन एमएलडी पाणी रानसई धरणातून घेतले जाते तर रोज पाच एमएलडी पाणी सिडकोकडून विकत घेऊन उरण करांची गरज भागवली जाते. उरण तालुक्याला आणि येथे असलेल्या प्रकल्पांना पाणीपुरवठा करण्यासाठी १९७० च्या दशकात हे धरण बांधण्यात आले होते. रानसईच्या निसर्गरम्य अशा डोंगर कपारीत हे धरण बांधले आहे. सुमारे ६.८ चौरस किलोमीटर क्षेत्रात हे धरण आहे. या धरणात दहा मिलियन क्यूबिक मिटर पाणीसाठविण्याची क्षमता आहे.

या रानसई धरणातून उरण तालुक्यातील २४ ग्रामपंचायती, उरण नगर परिषद आणि ओएजीसी, बीपीसीएल सारख्या इतर मोठ्या प्रकल्पांना पाणी पुरवठा केला जातो. उरण तालुक्यात गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणात औद्योगीक विकास झाल्याने येथे येणाऱ्या या प्रकल्पांना या धरणातूनच पाणी पुरवठा केला जात आहे. या धरणातून दररोज सुमारे ३५ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा केला जातो.

**सिडकोकडे आणखी पाच एमएलडीची मागणी**

**सिडकोकडून १० एमएलडी पाण्याची मागणी केली होती, मात्र सिडको सध्या रोज पाच एमएलडी पाणी देत असून उरणच्या लोकांची गरज भागविण्यासाठी हे पाणी पुरेसे असून रानसई धरण आणि सिडकोचे पाणी मिश्र करून उरणकरांना देण्यात येत आहे. साधारण २० जूनपर्यंत पुरेल एवढेच पाणी रानसई धरणात शिल्लक असल्याचे एमआयडीसी उरण प्रभारी उप अभियंता विठ्ठल पाचपुंड यांनी सांगितले. त्यामुळे नागरिकांनी काटकसरीने पाण्याचा वापर करावा, असे आवाहन करून सिडकोने आणखी पाच एमएलडी पाणी द्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.**

## संपादकीय

# सामुदायिक विवाहाला प्रोत्साहन

सामुदायिक विवाहसोहळ्यासाठीच्या अनुदानात २५ हजारांपर्यंत वाढ करण्यास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सकारात्मकता दर्शवली आहे. कर्ज काढून लग्नसोहळे केल्याने पालकांच्या मागे चिंता लागतात. असा खर्च टाळता यावा यासाठी सामुदायिक विवाहसोहळे गरजेचे असून ही समाज व काळाची गरज आहे, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटलेय. ते रास्तच आहे.

**विवाह... मानवी जीवनातील एक अनमोल सोहळा. प्रत्येकाला हे खास क्षण अविस्मरणीय व्हावेत असे वाटते. त्यात काही गैर नाही, पण अनेकजण हाती पैसा नसतानाही कर्ज काढून लग्नात उधळपट्टी करतात आणि नंतर मात्र कर्जाची रक्कम व्याजासहित फेडताना हीच हौस त्यांच्या अंगास येते. कोरोना काळात साऱ्यालाच 'ब्रेक' लागला होता. त्याला विवाहसोहळेही अपवाद नव्हते. एरवी गर्दीमध्ये होणारी लग्न कोरोना संसर्गावेळी अगदी मोजक्या लोकांमध्ये झाली. कोरोनाचा आवेग सरला आणि परिस्थिती पुन्हा 'जैसे थे' झाली. सध्या लग्नसराईचे दिवस सुरू आहेत. हल्ली लग्न हा इव्हेंट झाला आहे. असे म्हणतात की, हौसेला मोल नसते, पण हीच हौस खर्चिक ठरत आहे. लग्न ठरल्यानंतर घराच्या दुरुस्तीवर, मंडप सजावट, डीजेवर मोठा खर्च करण्यात येतो. त्याचबरोबर दागिने, कपडेलत्ते, किराणा सामान, अन्नधान्य, मिठाई, पूजा साहित्य, लग्नपत्रिका, फोटोग्राफर, व्हिडीओग्राफर, मिरवणूक यातही कळत-नकळत पैशांचा अपव्यय होतो. बड्या लोकांमध्ये रिसॉर्ट, बँक्वेट हॉल, हॉटेल, फार्म हाऊसवर लग्नांची क्रेझ आहे. मग तिथे ऑर्केस्ट्रा, शो यांची भर पडते. लग्नासाठी काही गोष्टी करणे अपरिहार्य मानले तरी अनेक ठिकाणी अतिरिक्त डामडौल पहायला मिळतो. सामाजिक प्रतिष्ठेच्या मानसिकतेमुळे खर्चाचा आलेख वाढत जातो. श्रीमंतांनी थाटामाटात लग्न केले तर त्यांना जमून जाते, पण मध्यमवर्गीय, गोरगरीबांसाठी घरातील लग्न म्हणजे कसरतच असते. तरीही अनेक मंडळी धूमधडाक्यात लग्नाचा बार उडवून देतात. वास्तविक लग्न हा एक संस्कार आहे. दोन जीवांचे पवित्र मिलन म्हणजे विवाह. रितीरिवाज व परंपरेनुसार सर्व गोष्टी करायला हरकत नाही, पण उगाचच अनावश्क गोष्टींवर कशाला खर्च करायचा? अनेकदा विवाह समारंभात मांसाहाराबरोबर मद्याचीही व्यवस्था केलेली असते. दारु प्यायल्यावर भान राहत नाही आणि मग वादावादीचे प्रसंग उद्भवतात. त्यातून या चांगल्या सोहळ्याला गालबोट लागते. खरंतर पूर्वीसुद्धा लग्न जोरदार होत असत. खूप मौज-मजा व रंगत त्यात असायची, पण स्पर्धेच्या युगात त्यामध्ये भपकेबाजपणा आला आणि विवाहसोहळ्यांचे स्वरूपच बदलले. हल्ली प्री-वेडिंग शुटींगपासून ते लग्नाचे बॅनर लावण्यापर्यंत प्रत्येक गोष्टीत दिखावा केला जातो. हे सर्व पाहता सामुदायिक विवाहसोहळ्याच्या संकल्पनेचे स्वागत व स्वीकार केला पाहिजे. यासाठी राज्यातील शिंदे-फडणवीस सरकार प्रोत्साहन देत असून आता सामुदायिक विवाहसोहळ्यात लग्न केलेल्या जोडप्यांना २५ हजार रुपयांची मदत राज्य सरकारच्या माध्यमातून मिळणार आहे. याआधी सामुदायिक विवाहसोहळ्यात लग्न केलेल्या जोडप्यांना १० हजार रुपयांची मदत दिली जात होती. यामध्ये १५ रुपयांची वाढ करण्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सकारात्मकता दर्शविली आहे. पालघर जिल्ह्यातील एका सामुदायिक विवाहसोहळ्यात त्यांनी याबाबत माहिती दिली. त्यांच्या उपस्थितीत ३२५ जोडपी विवाहबद्ध झाली. हा आदर्श इतरांनीही घेतल्यास त्यांचे पुढील जीवन सुकर होण्यास निश्चितपणे मदत होईल.**

# कृषी पर्यटनासाठी युवा शेतकऱ्यांचे आशास्थान सगुणाबाग

**खबरबात**
**विजय मांडे**





गावोगावी जमिनी विकणारे दलाल असल्याने मूळच्या शेतकऱ्यांऐवजी मुंबईकर शेतकरी कर्जत तालुक्यात जास्त आहेत. या मुंबईकर शेतकऱ्यांनी रिसॉर्ट, फार्महाऊस विकसित केले आहेत. शोकांतिका अशी की, त्या जमिनींचा मूळ मालक जमीन विकल्यावर आलेले पैसे उधळले की या मुंबईकर शेतकऱ्याच्या रिसॉर्टवर किंवा फार्म हाऊसवर काम करीत आहे. या सर्व गोष्टींवर मात केली आहे ती सगुणाबागेच्या कृषिभूषण शेखर भडसावळे यांनी. त्यांनी देशात कृषी पर्यटनाची संकल्पना सर्वप्रथम आणली आणि त्यामुळे आता कर्जत नव्हे तर ठाणे, रायगड जिल्ह्यातील युवा शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून कृषी पर्यटनाचे महत्व पटवून देत आहेत. त्यामुळे बरेचसे युवक आता पुन्हा शेतीकडे वळले आहेत.

कर्जत तालुक्यातील नेरळ नजीक असलेल्या मालेगाव येथे सगुणाबाग आहे. १९७८ साली अमेरिकेतून चांगल्या पगाराची नोकरी सोडून शेखर भडसावळे आपल्या मायदेशी परतले. आणि शेतीत लक्ष द्यायचे ठरवले. १९८० च्या दशकात त्यांच्या बागेत असलेले साप बघण्यासाठी आलेल्या पाहुण्यांशी गप्पा मारता - मारता कृषी पर्यटन ही संकल्पना उदयास आली. ग्रामीण भागाचा अनुभव घेण्यासाठी, कृषी पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी कृषी पर्यटन संकल्पनेचा जन्म झाला आहे. त्यांनी विविध प्रयोग व उपक्रम करून कृषी पर्यटनात क्रांती केली. कोणत्याही कृषी पर्यटन केंद्रात कामगारांना ते आपले घर वाटते. त्यामुळे रात्री कितीही वाजता पाहुणे कृषी पर्यटन केंद्रात पोहोचले तरी त्यांचे आनंदाने स्वागत करण्यात येते.

सगुणाबागेचे विशेष म्हणजे तेथे राहण्याची व्यवस्था मातीचे वीट काम करून निर्माण केली आहे. कोठेही ग्रामीण टच बदललेला दिसत नाही. तेथे आलेल्यांना स्थानिक कला, संस्कृती आदींचा आनंद मिळतो. जेवण शिजवण्याचा आनंद सुद्धा घेता येतो व पाटावर बसून भोजनाचा स्वादही घेता येतो. जागतिक दर्जाचे कृषी पर्यटन केंद्र म्हणून सगुणाबागेची ओळख आहे. सगुणाबागेत स्विमिंग पूल नाही मात्र पाहुण्यांना उल्हास नदीत डुंबण्याचा आनंद मिळतो. नदीच्या पाण्यात म्हशींवर बसून सफर जगात कुठेही नाही. त्याचा आनंद केवळ येथेच मिळतो. येथे मडकी घडविण्याचे कुंभार काम, अंगण सारवण्याचे काम, गवंडी मातीच्या विटा पडून बांधकाम करतो ते काम करण्याचा अनुभवसुद्धा येथे घेता येतो.

सगुणाबागेत किमान दीडशे प्रकारचे पक्षी असून त्यांना अनुभवण्यासाठी येणाऱ्या पक्षी प्रेमींचीही येथे नेहमीच गर्दी असते. तसेच जंगलात न आढळणारे विविध जातींचे साप येथे बघायला मिळतात. आकाश दर्शनासाठी सगुणाबाग हे खगोलप्रेमींचे जवळचे ठिकाण आहे. संक्रमणातून जात असलेल्या सगुणाबागेला जागतिक दर्जाचे बनविण्यात व्यवस्थापक चंदन शेखर भडसावळे व त्यांच्या मातोश्री प्रा. अनुराधा शेखर भडसावळे यशस्वी ठरले आहेत.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आज २२ मे रोजी सगुणाबाग कृषी पर्यटन केंद्रात भेट देणार आहेत. कृषीरत्न शेतकरी शेखर भडसावळे यांच्या जल, कृषी आणि पर्यावरण विषयक प्रकल्पांची पाहणी करणार आहेत. तसेच सगुणा रुरल फाऊंडेशन कडून आयोजित सगुणा राईस टेक्निक पद्धतीने शेती करणाऱ्या राज्यातील ३० शेतकऱ्यांचा सन्मान मुख्यमंत्र्यांचे उपस्थितीत होणार आहे.

# शासन आपल्या दारी...!

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजना

कुठल्याही योजनेचे यश हे लोकाभिमुखता, पारदर्शकता व सुलभ कार्यप्रणालीवर अवलंबून असते. सर्वसामान्यांची कामे सुलभरित्या व स्थानिक पातळीवर होणे आवश्यक असते. शासन प्रत्येक क्षेत्रात विकासाच्या अनेक योजना राबवित असते. गरजूंसाठी तो आधार तर असतोच त्याचप्रमाणे, सामूहिक विकासप्रक्रियेलाही त्यातून गती मिळत असते. हे लक्षात घेऊन नागरिकांना विविध योजनांचे थेट लाभ मिळावेत, यासाठी शासनाने शासन आपल्या दारी..! हा एक महत्वाकांक्षी विशेष उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत विविध शासकीय योजनांची जिल्हा माहिती कार्यालयामार्फत प्रसिध्दी करण्यात येत असून काय आहेत शासकीय योजना जाणून घेवू या लेखातून..



रायगड जिल्हा फळ उत्पादनामध्ये अग्रेसर असून जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर फळे व भाजीपाला पिकाचे व्यावसायिक पद्धतीने लागवड करून उत्पादन घेतले जात आहे. मागील दोन ते तीन वर्षापासून भाजीपाला पिकाचे निर्यातक्षम व विषमुक्त उत्पादन करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढत आहे. त्यामुळे भाजीपाला बियाण्याच्या चांगल्या जाती व रोपे याची मागणी रायगड जिल्ह्यात वाढत आहे.

या दृष्टीने नियंत्रित वातावरणामध्ये तयार केलेले कीड व रोगमुक्त रोपे तयार करणाऱ्या लहान रोपवाटिका उभारण्यास शासनामार्फत वाव देण्यात येत आहे. याच उद्देशाने कृषी विभागामार्फत राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी अर्ज महाडीबीटी (https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/) या ऑनलाईन प्रणालीवर घेणे सुरू असून, योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराकडे स्वतःच्या मालकीची किमान ०.४० हे. जमीन व रोपवाटिका उभारण्यासाठी पाण्याची सोय असणे आवश्यक आहे.

या योजनेत महिला कृषी पदवीधर, महिला बचतगट, महिला शेतकरी, भाजीपाला उत्पादक अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व शेतकरी गट यांना प्राधान्याने लाभ देण्यात येत आहे. निवड झालेल्या लाभार्थ्यास रोपवाटिका उभारणीसाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत पुरुष संमती देण्यात येते, संमती नंतर शेडनेटहाऊस (१००० चौ.मी.), पॉली टनेल (१००० चौ.मी.), पॉवर नॅपसॅक स्प्रेअर- एक नग, प्लास्टिक क्रेट्स-६२ प्रमाणे या घटकाची उभारणी करणे आवश्यक असेल.

शेतकऱ्यांस खर्चाच्या ५० टक्के किंवा दोन लाख ७७ हजार ५०० रुपये अनुदान देय आहे. अशा नाविन्यपूर्ण योजनेचा लाभ घेतल्यास शेतकऱ्यांस जोडधंदा मिळाल्यामुळे नक्कीच आर्थिक फायदा होईल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी कृषी विभागाच्या कार्यालयाशी संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्वला बाणखेले यांनी केले आहे.

**-मनोज शिवाजी सानप,**
जिल्हा माहिती अधिकारी,
रायगड-अलिबाग




# घर, छोट्या व्यवसायासाठी फायदेशीर आहे 'हा' प्रिंटर



आजकाल प्रिंटरच्या मदतीनं प्रिंट आऊट आणि फोटोकॉपी सारखी कामे सहज करता येतात, परंतु अलीकडेपर्यंत, घर किंवा लहान ऑफिसेससाठी एक उत्तम प्रिन्टर निवडणं कठीण होतं. पण आता बाजारात चांगले कनेक्टिव्हिटी आणि कॉम्पॅक्ट असलेले अनेक पर्याय उपलब्ध आहेत. HP Smart Tank 580 Ink Tank हा असाच एक प्रिंटर आहे. जलद आणि सोपी कनेक्टिव्हिटी या प्रिन्टरचं वैशिष्ट्य आहे. इंकजेट प्रिंटरच्या तुलनेत, एचपीचा हा इंक टँक प्रिन्टर एक परवडणारा आणि उत्तम पर्याय आहे. या नवीन प्रिन्टरबद्दल आपण जाणून घेऊ.

हा एचपी स्मार्ट टँक ५८० इंट टँक प्रिन्टर कॉम्पॅक्ट डिझाइनसह येतो. प्रिन्टरची बिल्ड क्वालिटीही अतिशय मजबूत आहे. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे कॉम्पॅक्ट डिझाइनमुळे ते लहान डेस्कवर सहजपणे ठेवता येऊ शकते. यामध्ये एक स्कॅनरही देण्यात आलाय. प्रिन्टरमध्ये एक छोटी स्क्रीन दिली आहे ज्यावर प्रिन्टींग स्टेटसही तुम्ही पाहू शकता.

या एचपी प्रिंटरमध्ये कलर प्रिंट, ब्लॅक अँड व्हाइट प्रिंट, इन्फॉर्मेशन, पॉवर बटण अशी अनेक बटणे उपलब्ध आहेत. या प्रिन्टरमध्ये इंक टँक समोरील बाजून दिसतात. विशेष म्हणजे या इंक टँकमध्ये तुम्ही किती शाई आहे हेदेखील पाहू शकता. या कॉम्पॅक्ट प्रिन्टरमध्ये, पानांसाठी मागील बाजूस एक ट्रे देण्यात येतो. या प्रिंटरच्या साहाय्यानं एकाच वेळी ३० पानं प्रिन्ट करता येतात.

या प्रिन्टरला दुसऱ्या डिव्हाइसशी कनेक्ट करणं अतिशय सोपं आहे. सर्वप्रथम प्रिन्टरमधील इंक टँकमध्ये इंक भरा. विशेष म्हणजे तुम्ही या प्रिन्टरसोबत आलेलं यूजर मॅन्युअल पाहून सहज प्रिंट-रेडी करू शकता. जर तुम्ही प्रिन्टरला वाय-फायद्वारे कनेक्ट करत असाल, तर तुम्हाला तुमच्या फोनवर एच ॲप इंस्टॉल करणं आवश्यक आहे. यानंतर तुम्ही इतर कोणत्याही फोनवरून सहज प्रिन्ट करू शकता. या नव्या प्रिन्टरसोबत येणाऱ्या इंकच्या माध्यमातून १२००० ब्लॅक अँड व्हाईट पेजेस आणि सहा हजार कलर पेजेस प्रिन्ट करता येतात.

केवळ १८८४८ रुपयांमध्ये तुम्ही हा प्रिन्टर विकत घेऊ शकता. यामध्ये एनर्जी सेव्हिंग ऑटो ऑन-ऑटो ऑफ टेक्नॉलॉजीचा वापर करण्यात आलाय. आवश्यकता नसेल तेव्हा तुम्ही प्रिन्टर बंद किंवा गरज असताना तो चालू करू शकता. याचा प्रिन्टींगचा वेगही उत्तम असून मिनिटाला १०-१२ ब्लॅक अँड व्हाईज पेजेस आणि चार ते पाच कलर पेजेस प्रिन्ट करू शकता.

# आधुनिक भारताचे जनक राजा राममोहन रॉय



**निमित्त**

महान समाजसुधारक आणि अनेक सामाजिक चळवळींचे नेते राजा राम मोहन रॉय यांचा आजच्या दिवशी जन्म झाला. या दिवशी त्यांचे स्मरण करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते, कारण भारताच्या आधुनिकीकरणासोबतच महिला आणि सर्व वाईट प्रथांविरुद्ध आवाज उठवणारे आणि समाजसुधारक म्हणून उदयास आलेले लोक फार कमी आहेत. राजा राम मोहन रॉय यांना आधुनिक भारताचे जनक म्हटले जाते. त्यांचा जन्म २२ मे १७७२ रोजी बंगालमधील ब्राह्मण कुटुंबात झाला आणि ते ब्राह्मो समाजाचे संस्थापक होते. राजा राम मोहन रॉय हे स्वातंत्र्यापूर्वी अनेक सामाजिक सुधारणा चळवळींमध्ये अतिशय सक्रिय भूमिका बजावताना दिसले.

पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्ह्यातील राधानगर गावात २२ मे १७७२ रोजी जन्मलेल्या राजा राममोहन यांचे प्राथमिक शिक्षण गावातच झाले. त्यांच्या वडिलांचे नाव रामकांत रॉय वैष्णव होते. त्यांच्या वडिलांनी राजा राममोहन यांना चांगल्या शिक्षणासाठी पाटण्याला पाठवले. वयाच्या १५ व्या वर्षी ते बांगला, पारशी, अरबी आणि संस्कृत शिकले होते, यावरून ते किती हुशार असावेत याचा अंदाज येतो.

सती, बालविवाह यांसारख्या अनेक वाईट प्रथांपासून त्यांनी समाजाला मुक्ती दिली. राजा मोहन रॉय यांनीही देश आणि समाजातील दुष्कृत्ये नष्ट करण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीची नोकरी सोडली होती. त्यांनी लहानपणापासूनच सनातनी हिंदू विधी आणि मूर्तीपूजेचा त्याग केला होता. त्याच वेळी त्यांचे वडील रामकांत रॉय हे कट्टर हिंदू ब्राह्मण होते.

राजा राम मोहन रॉय यांचे संपूर्ण आयुष्य स्त्रियांसाठी त्यांचे हक्क मिळवण्यासाठी लढण्यात गेले. या वाईट गोष्टी दूर करण्यासाठी त्यांनी जनजागृती सुरू केली. त्यांनी गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बॅटिंग यांच्या मदतीने सती प्रथेविरुद्ध कायदा बनवला. त्यांनी अनेक राज्यात जाऊन सती प्रथेविरुद्ध लोकांना जागृत केले. लोकांची विचारसरणी आणि ही परंपरा बदलण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. सती प्रथेमध्ये एका विधवेला तिच्या पतीच्या अंत्यसंस्कारासाठी जबरदस्तीने जाळण्यात आले होते. त्यांनी महिलांना पुरुषांप्रमाणे समान हक्क मिळावेत यासाठी मोहीम चालवली. ज्यामध्ये त्यांनी पुनर्विवाहाचा अधिकार आणि मालमत्तेचा अधिकार यांचाही पुरस्कार केला होता.

राजा राम मोहन रॉय यांचाही मूर्तीपूजेला विरोध होता आणि त्यांना नवाबाच्या दरबाराने 'राय' ही सन्मानदर्शक पदवी दिली. यासोबतच त्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याबरोबरच पत्रकारितेच्या क्षेत्रातही महत्त्वाचे योगदान दिले. ते जातिव्यवस्थेचे कट्टर विरोधक होते. बुद्धिप्रामाण्य, व्यक्तिस्वातंत्र्य आणि मानवी समानता ही तीन मूल्ये या प्रज्ञाशाली पुरूषाने भारतीयांना उपलब्ध करून दिली.

**(साभार : इंटरनेट)**


**क्लिक...क्लिक...!**



**अलिबाग : फेसळणाऱ्या लाटा, सकाळच्या सोनेरी किरणांमुळे समुद्र किनाऱ्यावरील निर्माण झालेले आल्हाददायक वातावरण पर्यटकांना खुणावत आहे.** (छाया : अमेय नाझरे)

## आरोग्य प्रहर

# जांभूळ अतिशय गुणकारी, पण खाताना टाळा 'या' चुका!



जांभूळ खाण्याचे अनेक आरोग्य फायदे आहेत. आपण जांभूळ खाण्याच्या पद्धतींकडे जास्त लक्ष देत नाही. ज्यामुळे आपण आजारी पडतो किंवा आरोग्याशी संबंधीत अनेक समस्या उद्भवतात. चला जाणून घेऊया जांभुळ खाताना कोणत्या गोष्टी टाळल्या पाहिजेत.

**रिकाम्या पोटी जांभुळ खाणे टाळा** -रिकाम्या पोटी जांभुळ खाणे आरोग्यासाठी हानिकारक आहे आणि यामुळे तुमच्यासाठी अनेक समस्या उद्भवू शकतात. जांभुळची चव आंबट असते, त्यामुळे रिकाम्या पोटी जांभुळ खाल्ल्याने ॲसिडीटी, पोटदुखी, पोटात जळजळ यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

**जांभुळ आणि हळद एकत्र कधीही खाऊ नका** - जांभुळ खाल्ल्यानंतर लगेच हळदयुक्त पदार्थ खाल्ल्याने पोटात जळजळ होऊ शकते. जांभुळ खाल्ल्यानंतर हळद खाण्याची इच्छा असेल तर किमान ३० मिनिटे थांबा. वास्तविक, जांभुळ आणि हळद एकत्र मिसळल्याने शरीरात प्रतिक्रिया होऊ शकते. ज्यामुळे तुम्हाला बराच काळ अस्वस्थ वाटेल.

**दूध आणि जांभुळ एकत्र खाल्ल्याने गॅस होतो** - दूध आणि जांभुळ एकत्र सेवन केल्याने आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवू शकतात. हे फळ खाल्ल्यानंतर लगेच दूध प्यायल्याने गॅस, पोटदुखी यांसारख्या पचनाच्या समस्या होऊ शकतात. जांभुळ खाल्ल्यानंतर लगेच दूध आणि दुग्धजन्य पदार्थांपासून दूर रहा आणि किमान ३० मिनिटांनंतरच दूध प्या.

**लोणचे आणि जांभुळ एकत्र खाऊ नका** - घरी बनवलेले आंबट-गोड लोणचे खायला कोणाला आवडत नाही. पण इथे काही फूड कॉम्बिनेशनसोबत लोणचे खाल्ल्याने तुमच्या आरोग्याला हानी पोहचू शकते. या दोन गोष्टींच्या मिश्रणाने पोटाचा त्रास होऊ शकतो.

**जांभुळ खाल्ल्यानंतर कधीही पाणी पिऊ नका** - जांभुळ खाल्ल्यानंतर लगेच पाणी पिणे टाळावे कारण जेवल्यानंतर लगेच पाणी पिणे हे अनेक समस्यांवर मेजवानीसारखे आहे. त्यामुळे डायरियासारखा आजार तुम्हाला घेरतो. येथे जांभुळ खाल्ल्यानंतर ३० ते ४० मिनिटांनंतरच पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो.

# खालापूर तालुक्यात पाणीटंचाईच्या झळा तीव्र

**खोपोली : प्रतिनिधी**

आडातच नाही तर पोहऱ्यात कुठून येणार अशी परिस्थिती सध्या खालापूर तालुक्यातील ग्रामीण भागात पहायला मिळत आहे. उन्हाची तीव्रता वाढल्याने तालुक्याला पाणी टंचाईच्या झळा बसू लागल्या आहेत.

प्रशासनाकडून पाणीटंचाईवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू असले तरी हे प्रयत्न तोकडे पडत असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. सध्या खालापूरमध्ये पाच ते सहा गावांत टँकरने पाणीपुरवठा केला जात असून आणखी १० गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्याचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, तर १५हून अधिक वाड्या व गावांमधील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी इंधन विहीरींसह इतर उपाययोजना करण्यात येणार आहेत.

मे महिन्यात उन्हाची तीव्रता अधिक जाणवू लागली आहे. उन्हामुळे विहीरी कोरड्या पडल्या असून धरणांचा पाणीसाठाही कमी झाला आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. या ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा करावा अशा प्रकारचे प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत. सध्या या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न आहे. तालुक्यातील परखंदे, शिरवली, डोणवत ठाकुरवाडी, वावोशी बौद्धवाडा, दांडवाडी, गोहे आदिवासीवाडी, बीड खुर्द आदिवासीवाडी, नडोदे आदिवासीवाडी, खरीवली आदिवासीवाडी, नारंगी आदिवासीवाडी, देवकुंड आदिवासीवाडी, शिरवली ढेबेवाडी, चिंचवली-गोहे आदिवासीवाडी, बोरगाव तारवाडी, वरोसे आंबेवाडी या ठिकाणी पाणीटंचाई असल्याने ग्रामस्थांना पाण्यासाठी करावी लागणारी वणवण थांबविण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलली असून ही गावे व वाड्यांमध्ये अनेक इंधन विहिरी व पाणी साठवणूक टाक्या पूर्णत्वास आल्या आहेत, तर काही प्रकल्प प्रस्तावित आहेत. दीर्घकालीन उपाय झाल्यावर या ठिकाणी असलेला पाणीटंचाईचा प्रश्न निकालात निघेल असा विश्वास प्रशासनाला आहे. खालापूर तालुक्यात तीन मोठी धरणे अनेक पाझर तलाव व तालुक्यातून बारा महिने वाहणारी पाताळगंगा नदी असतानाही खालापूरकरांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.



### ■ हंडाभर पाणी मिळविण्यासाठी महिलांची धावपळ

***खालापूर तालुक्यातून पाताळगंगा ही नदी वाहते. मोर्बा, कलोते, डोणवत या धरणांबरोबरच आत्करगाव, नढाळ यांच्यासह अनेक पाझर तलावही तालुक्यात आहेत. असे असताना अनेक गावे व वाड्यांवर पिण्याचे पाणी नसल्याने महिलांना हंडाभर पाणी मिळविण्यासाठी धावपळ करावी लागते. बारा महिने वाहणाऱ्या पाताळगंगा नदीच्या पाण्यावर अनेक गावांच्या योजना पुर्ण होवू शकतात, मात्र प्रशासनाची उदासीनता व स्थानिकांची बोटचेपी भूमिका यामुळे खालापूर तालुक्यातील जनतेला पाणीटंचाईचा सामना करावा लागतो आहे.***

## मुरूड समुद्रकिनारा होणार विकसित!

### सुशोभिकरणाला सुरुवात; पर्यटकांचा ओघ वाढणार

**मुरूड : प्रतिनिधी**

राज्यातील गतिमान सरकारमुळे अनेक विकासकामे मार्गी लागत आहेत. प्रत्येक क्षेत्राचा विकास करण्याच्या उद्देशाने अनेक निर्णय घेतले जात आहेत. त्या अनुषंगाने रायगडातील पर्यटनविकास करण्याकडे भर दिला जात असून मुरुड येथील समुद्रकिनारी सुशोभिकरण कामाला सुरुवात झाली आहे. मुरुड परेश हॉटेल समुद्रकिनारा ते गोल्डन स्वॉन ब्रिच हॉटेल समुद्रकिनारापर्यंत सुशोभिकरणाला सुरुवात झाल्याने याठिकाणी पर्यटकांचा ओघ नक्कीच वाढणार आहे.

मुरुड तालुका पर्यटन क्षेत्र असुन या ठिकाणी रोजच्या रोज शेकडो पर्यटक ये-जा करित असतात, परंतु पर्यटकांचा जास्त ओघ राजपुरी येथील जंजिरा किल्ला व काशिदाचा समुद्र या ठिकाणी असायचा. मुरूड समुद्राकिनारा यापासून वंचित असायचा समुद्र स्वच्छ व सुंदर असुन याठिकाणी पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली होती.

यांचा परिणाम स्थानिक छोट्या मोठ्या व्यवसायिकावर होऊ लागला. यांची दखल मुरूड-जंजिरा नगर परिषदेमार्फत घेण्यात आली.



पर्यटकांच्या सौंदर्यीकरण सह पर्यटकांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करण्याकरिता मुरूड नगर परिषदेच्या वैशिष्ट्य पुर्ण योजनेतून मुरूड समुद्रकिनारी सुरुची उद्यान विकसित करण्यात येणार आहे. यासाठी तीन कोटी ९४ लाख ८५ हजार ४३५ रुपये मंजूर करण्यात आले आहे.

या उपलब्ध निधीतून पर्यटनस्थळांवर पर्यटकांसाठी सुविधा उभारण्यात येणार आहेत. त्याचा ठेका पुणे येथील व्ही.डी.के.फॅसिलिटी सर्व्हिर्सेस यांना मिळाला असुन कामाला सुरुवात झाली आहे. लवकरच समुद्रकिनाऱ्यावर सागरी धुपप्रतिबंधक बंधारा, लॉन, फ्लॉवर बेड, वाहनतळ निर्मिती, स्वच्छतागृह, पाथवे आदी सुविधांचा समावेश असणार आहे. त्यामुळे पर्यटकांचा ओघ वाढुन स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. यामुळे मुरूड समुद्राकिनारा आकर्षक सुंदर समुद्रकिनारा याठिकाणी दिसेल.

याबाबत मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी सांगितले की, स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांनी मुरूड शहराच्या विकासासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिल्यामुळे सदरील विकासाठी मोठा निधी प्राप्त झाला आहे. पर्यटक व स्थानिक नागरिक यांना सर्वोत्तम सुविधा देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे.

## गाडीत विसरलेले सोने प्रवाशाला सुपूर्द

**रोहे : प्रतिनिधी**

रेल्वे सुरक्षा बल हे रेल्वेच्या मालमत्तेसह प्रवाशांचा जीव व त्यांच्याकडील मौल्यवान सामानाच्या सुरक्षेची कर्तव्यदक्षपणे काळजी घेते याचे उदाहरण रोहा रेल्वे पोलिसांनी शनिवारी केलेल्या कामगिरीवरून दिसून आले.

मध्य रेल्वे लहान बालके, महिला यांचे सुरक्षिततेसाठी विविध अभियान राबवत असतानाच प्रवासादरम्यान हरवलेले प्रवाशांचे किमती व मौल्यवान साहित्य मिळवून देण्यासाठी अमानत अभियान राबविण्यात येते. या अंतर्गत दिवा रोहा या गाडी क्र. ०१३४७ या गाडीने प्रवास करणाऱ्या प्रवाशाची विसरलेली बॅग पुन्हा त्या प्रवाशास तत्काळ मिळवून दिली.

नागोठणे येथे उतरलेल्या या प्रवाशास आपली बॅग गाडीतच राहिल्याचे लक्षात येताच त्याने रोहा येथील आपल्या मित्राद्वारे रोहा रेल्वे पोलिसांशी संपर्क साधत यासंबधी माहिती दिली. रोहा रेल्वे पोलीस चौकी निरिक्षक संजय जगताप यांचे मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक राकेश पाटीदार यांनी आरक्षक पवन कुमार यांच्यासोबत रोहा येथे आलेल्या गाडीची तपासणी करत विसरलेली बॅग तत्काळ हस्तगत करत आतील १३ तोळे सोन्यासह प्रवाशाच्या ताब्यात दिली.

## अलिबागमध्ये शनिवारी जाहिरात सेमिनार

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग येथील ब्रायडिआ आणि आदर्श पतसंस्था यांच्या सहकार्याने मुंबईतील 'पार्किंग' या जाहिरात संस्थेतर्फे २७ मे रोजी आदर्श भवन येथे जाहिरात सेमिनार आयोजित करण्यात आला आहे. भारतात ग्रामीण भागात सर्वप्रथम जाहिरातीचा सेमीनार आयोजित करण्याचा मान अलिबागला मिळाला आहे. जागतिक पातळीवर १५०हून अधिक पारितोषिके मिळवणारे उदय पारकर हे या सेमिनारमध्ये मार्गदर्शन करणार आहेत.

या सेमिनारचा उद्देश नफा नसून विद्यार्थी, पालक तथा व्यावसायिकांना एक सुवर्णसंधी आहे. जागतिक कीर्तीचे जाहिरात बनवणारे तज्ज्ञ या सेमिनारमध्ये सहभागी होणार आहेत. अलिबागला या सेमिनारमुळे शिक्षण आणि व्यावसायिकता या दोन्ही दृष्टीकोनातून मोठा फायदा होणार आहे. विद्यार्थी, पालक, शिक्षक, व्यावसायिक, ग्राफिक डिझाइनर या सेमिनारध्ये सहभागी होऊ शकतात. तीन ते चार तासांचा हा सेमीनार असेल, अशी माहिती आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी दिली.

या सेमिनारमध्ये कंपनीचा लोगो कसा असावा, मार्केटिंग म्हणजे काय, ती करायची कशी? याचे ज्ञान उदय पारकर देतील. ब्रॅण्डिंग आणि मार्केटिंगचे व्यवसायात किती आणि कसे महत्त्व आहे याचे ज्ञान देतील. तुमचा व्यवसाय यशस्वी होण्यासाठी तुम्ही तुमच्या बिसिनेस आणि वैयक्तिक मर्यादे बाहेर पडून तुमची विचारसरणी लोकांपर्यंत नेणे आणि स्वत:साठी ग्राहकवर्ग तयार करणे आवश्यक आहे. जाहिरात आणि विक्री हा मार्केटिंगचा एक भाग आहे, पण मार्केटिंग हे फक्त एवढ्यापुरतेच मर्यादित नाही. त्याच्याशी संबंधित बऱ्याच गोष्टींची माहिती या सेमिनारद्वारे देण्यात येईल.

सेमिनार हॉलमध्ये उदय पारकर यांनी केलेली जगभरातून पारितोषिके मिळालेली ब्रँड लोगो आणि मार्केटिंग ची कामे जवळून पाहायला मिळतील तसेच उदय पारकर यांच्यासोबतप्रश्न उत्तरे आणि चर्चा करता येईल. या सेमिनारचे रेजिस्ट्रेशन ऑनलाईन घेण्यात आले आणि देशभरातून मोठं मोठ्या संस्थांमधून १०० डिझायनर्स, विद्यार्थी आणि व्यावसायिक या सेमिनारमध्ये सहभागी होण्यासाठी २७ मे रोजी अलिबागला भेट देणार आहेत. हा कार्यक्रम १५ दिवस आधीच हाऊसफुल झाला आहे.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मुळ भुखंडधारक - १) श्रीमती. वसुधा रमाकांत ननावरे २) श्रीमती सुनंदा रत्नाकर पाटील उर्फ सुनंदा हिरामण उरणकर ३) श्रीमती वासंती अरुण गोरेगावकर ४) श्रीमती छाया संदिप शेलार ५) श्री. संतोष हिरामण उरणकर सर्व राहणारः ए १ / ३०१, निल समृध्दी सि.एच.एस, देशमुख लेन, अशोका गार्डन समोर, जुना पनवेल, जि. रायगड, ४१० २०६ यांच्या मालकीच्या संपादित मिळकतींच्या मोबदल्यात शासनाच्या साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेअंतर्गत मौजे : करंजाडे नोड तालुका - पनवेल, जिल्हा रायगड येथे खालील वर्णनाचे भुखंड वाटप करण्यात आलेला आहे.

**भुखंडाचे वर्णन**

**मौजे करंजाडे नोड, ता. पनवेल, जि. रायगड - सिडको संचिका नं. १३३**

| नोड | सेक्टर नं | भुखंड नं | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| करंजाडे | ५ | ७८ | ४४९.१७ चौ. मी |

वर नमूद करण्यात आलेल्या भुखंडाबाबत सिडको महामंडळ आणि मुळ भुखंडधारक यांच्यात भाडेपट्टा करार / ॲग्रीमेंट टू लिज हा दिनांक २२/०२/२०२३ रोजी करण्यात आलेला असून सदरचा भाडेपट्टा करार हा पनवेल येथील सह दुय्यम निबंधक क्र. ४ यांचे कडे दिनांक २३/०२ / २०२३ रोजी रितसर नोंदणीकृत करण्यात आलेला असून त्याचा दस्त नं. २४५२ /२०२३ हा आहे. सबब अश्याप्रकारे मुळ भुखंडधारक यांचे सदर भुखंडामध्ये हक्क व अधिकार निर्माण झालेले आहेत.

वर नमूद करण्यात आलेल्या मौजे : करंजाडे नोड, येथील भुखंड नं. ७८, सेक्टर नं. ५, एकूण क्षेत्र ४४९.१७ चौ. मी. या भुखंडापैकी ५० टक्के क्षेत्राचे भुखंड आमचे अशिल नं. - **१) नेक्सेस एंटरप्रायझेस (Nexus Enterprises) भागीदारी संस्थेतर्फे भागीदार अ) श्री. देवजी जिवराज पटेल २) श्री. महेश नरसिंह चौधरी ३) श्री. महादेव पुंजालाल पटेल** कार्यालयीन पत्ताः ऑफिस नं. ३१, दुसरा मजला, प्लॉट नं. १८ आणि २७, क्रिस्टल प्लाझा, सेक्टर नं. ७, खारघर, नवी मुंबई, ४१० २१० यांनी **तसेच उर्वरीत ५० टक्के क्षेत्राचे भुखंड आमचे अशिल नं. - २) आर. ए. इन्फ्रा (R A Infra) भागीदारी संस्थेतर्फे भागीदार अ) श्री. रामचंद्र कृष्णा जाधव २) श्री. अशोक विठ्ठल शिंगाडे कार्यालयीन पत्ता: द टेनन्स को. ऑ.हौ.लि., ३/६ समर्थनगर, चुनाभट्टी स्टेशन जवळ, सायन, चुनाभट्टी इस्ट, मुंबई ४०००२२** यांचे नावे सिडको दप्तरी त्रिपक्षीय करार (Tripartite -greement ) व्दारे हस्तांतरीत करण्याचे ठरविलेले आहे.

तरी सदर भुखंड अगर सदर भुखंडाच्या कोणत्याही भागावर कोणाही व्यक्ती, संस्था किंवा कंपनी यांचा कोणाचाही साठेकरार, विक्रीकरार, विकसनकरार, भाडेपट्टा, खरेदी, गहाण, दान, बक्षीस, तारण, एम.ओ.यु., दावा, वादविवाद, इजमेंट, कुळवहिवाट, चार्ज, ॲटॅचमेंट, वारसाहक्क व इतर कोणत्याही प्रकारचे हक्क व हितसंबंध असल्यास सदर व्यक्ती, संस्था अगर कंपनी वा त्यांचे हितसंबंधी यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी खालील सही करणार यांच्या कार्यालयात लेखी कळवावी. वरील मुदतीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर भुखंड हा निर्वेध व बोजारहित असून त्यामध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही असे आमचे अशिल गृहित धरुन सदरहु भुखंड सिडको कार्यालयातून आवश्यकती कार्यवाही पूर्ण करुन कायमस्वरुपी आपले नावे त्रिपक्षीय करारावद्वारे हस्तांतरीत करुन घेतील, आणि सदर १५ दिवसाच्या मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक : २१/०५/२०२३

**सही/-**

**ॲड. योगिता किशोर पाटील**

**पत्ता :** १०२, पहिला मजला, श्री बालाजी को. ऑ.हौ. लि., सारस्वत बँकेच्या वर, जुना पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, ४१० २०६


## खंडाळा घाटात शॉर्टकटसाठी प्रवाशांच्या जीवाशी खेळ; हाईट बॅरिअर बसवूनही बसचालकांची घुसखोरी

**खोपोली : प्रतिनिधी**

खंडाळा घाटात भीषण बस अपघातानंतर अशा प्रकारच्या अपघाताची पुनरावृत्ती होवू नये यासाठी महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, आयआरबी आणि वाहतूक पोलीस यंत्रणा यांच्या पुढाकाराने दोन ठिकाणी हाईट बॅरिअर बसवण्यात आले, परंतु शॉर्टकटसाठी प्रवाशांच्या जीवाशी खेळ करत घुसलेल्या बस चालकाने हाईट बॅरिअरदेखील धडक देऊन घुसखोरीचा प्रयत्न केला. या वेळी जागृत पोलिसांमुळे बस अडवून चालकाला ताब्यात घेतले.



१५ एप्रिल रोजी जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर घाट उतरताना चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे बस दरीत कोसून झालेल्या अपघातात १३ जणांना जीव गमवा लागला होता तर २८ जण गंभीर जखमी झाले होते. बस अपघात झाला त्या ठिकाणी मोठ्या वाहनांना प्रवेश निषिद्ध असतानादेखील अनेकजण नियम पायदळी तुडवत असल्याने अपघात घडले होते. घाटातून थेट खोपोली गावात उतरण्यासाठी हा मार्ग जरी शॉर्टकट असला तरी अवघड वळणामुळे थेट मृत्यूच्या दारात हा मार्ग जात होता. अपघातांना कायमचा पायबंद बसावा यासाठी हाईट बॅरिअर बसवण्यात आले.

मुंबई-पुणे एक्सप्रेसला घाटात ज्या ठिकाणी जुन्या मुंबई पुणे महामार्ग जोडला जातो त्या ठिकाणी हाईट बॅरिअर तसेच खिंडीत हाईट बॅरिअर बसविण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर केवळ हलकी वाहने चारचाकी यांना मार्ग वापरता येणार होता, परंतु खासगी प्रवासी वाहतूक करणारी बस या मार्गाने घुसखोरी करून येत असताना हाईट बॅरिअर ला धडकली. वाहतूक पोलिसांच्या प्रकार लक्षात येतात बसच्या चालकाला ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणण्यात आले. असाच प्रकार पुन्हा शनिवारी सकाळी घडला. महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाची प्रवाशांनी भरलेली बस या मार्गातून नेण्याचा प्रयत्न चालकाने केला. वाहतूक पोलिसांनी बस थांबवून चालकाला सुरक्षित मार्गाने नेण्यास भाग पाडले.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated Cost | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-13/23-24/ **RFx No. 7000027381** | AMC for regular maintenance work, Outage work and attending emergency breakdown work of 220 kV & 400 kV Transmission Lines under jurisdiction of 400 kV Line Maintenance S/dn, Nagothane under EHV O&M Circle, Panvel... **1st Ext...** | Limited to Rs. 25 Lakh | 27.05.2023 up to 15:00 Hrs. |

**EMD: 1% of Estimate Cost** i.e. Rs. 25,000/- **Tender Fee:** Rs. 500/- + GST.
For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** Mitesh Goyal (DY. EE) Mob No. 9461456635
e-mail ID: **ee7230@mahatransco.in**
**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R.S. (O&M) Dn., Nagothane**


## शिहू शाळेतील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

### तब्बल २३ वर्षांनी एकत्र येत आठवणींना दिला उजाळा

**पाली : प्रतिनिधी**

माध्यमिक शाळा शिहू येथे सन २००० मधील इयत्ता १० वी मध्ये शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांचे गेट टुगेदर सुधागड येथील निसर्गरम्य स्थळ असलेल्या आण्णा फार्म येथे अत्यंत खेळीमेळीचे व आनंददायी वातावरणात झाले.

या वेळी अनेक माजी विद्यार्थी विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या. इयत्ता आठवी पासून ते दहावीपर्यंत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी हायस्कूलमध्ये शिक्षण घेताना आलेल्या अडचणींबरोबरच जुन्या आठवणींना उजाळा दिला. या वेळी अनेकजण जुन्या आठवणी सांगताना भावुक झाले. माजी विद्यार्थी व निष्णात वकील म्हणून प्रसिद्ध असलेले ॲड. विजयपाल सावंत यांचे कोविडमध्ये दुर्दैवी निधन झाल्याने सर्वांनी दुःख व्यक्त करून त्यांना प्रारंभीच आदरांजली वाहण्यात आली.

गेट टुगेदरचा कार्यक्रम हा दहावी इयत्ता सोडून झाल्यानंतर २३ वर्षानंतर प्रथम च माजी सैनिक, माजी विद्यार्थी मंगेश घासे व अन्य सर्व सहकाऱ्यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी सुमारे २५ ते ३० माजी विद्यार्थी-विद्यार्थीनी हजर होत्या.

या वेळी माजी विद्यार्थी पत्रकार धम्मशील सावंत म्हणाले की, आपण एकदा शाळेतून शिक्षण पूर्ण केल्यानंतर आपली जबाबदारी विसरतो. कधीतरी शाळेला भेट देणे ही आपली जबाबदारी आहे. शिक्षकांचे आपल्या जडणघडणीत असलेले योगदान स्मरणात राहिले पाहिजे, प्रत्येकाच्या सुखदुःखात सहभागी झाले पाहिजे असे सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वच माजी विद्यार्थी-विद्यार्थीनींनी संकल्प केला की, शिहू हायस्कूलसाठी आवश्यक असणारे साहित्य भेट देण्याचा निर्धार केला. तसेच इतर गोरगरीब गरजू विद्यार्थ्यांनादेखील शैक्षणिक साहित्य देण्याचा निर्धार सर्वांनी केला. या मेळाव्याला चंद्रकांत कोकाटे, किरण भोईर यांनी सुमधुर गीते सादर करून सर्वांना खिळवून ठेवले.




## जाहीर नोटीस

माझ्या अशिलांच्या वतीने सर्व जनतेस या नोटीसिद्वारे असे सुचित करण्यात येते कि, खालील भुखंडाचे मालक **१) श्री. अंकुश चांगु म्हात्रे, २) श्री. सुमित अंकुश म्हात्रे व ३) श्री. अभिजीत अंकुश म्हात्रे,** रा. : मु.पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड ४१० २०६. यांच्या नावे सिडकोकडून प्रस्तावित नवी मुंबई अंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी गावठाणामधिल संपादीत करण्यात येणाऱ्या जमिनीबद्दल व त्यामधिल स्थलांतरीत होणाऱ्या निवासी वापराच्या बांधकामाबद्दल नुकसान भरपाईपोटी व पुनःस्थापनेसाठी निवासी वापराकरीता सिडको संचिका क्र. **ULV-[C]G-147** न्वये भुखंड क्र.३५७.से.२४.क्षेत्रफळ १८० स्क्वे.मि..पुष्पक वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड या वर्णनाचा भुखंड वितरीत झालेला आहे. सदर भुखंड माझे अशिल **जय मल्हार कंन्स्ट्रक्शनतर्फे मालक श्री. प्रथमेश चंद्रविलास भर्णुके** रा.- घर नं.५५०.नारायण निवास.नेरूळगाव,से.२०., नेरूळ (वेस्ट) नवी मुंबई ४००७०६. यांना ५०%- ५०% तत्वावर विकसित करण्यासाठी दिलेला आहे. सदर भुखंडामधील माझ्या अशिलांच्या हिश्श्याचा भुखंड ते त्यांच्या नावे विकसन करारनाम्याद्वारे / त्रिपक्षिय करारनाम्याद्वारे कायमस्वरूपी हस्तांतरण करीत आहेत.

**भुखंडाचे वर्णन**

| नोड | सेक्टर | भुखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| पुष्पक वहाळ | २४ | ३५७ | १८०.०० चौ. मी |

तरी कोणीही व्यक्ती/ व्यक्तीचे किंवा अर्थिक संस्थांचे सदर भुखंड संदर्भात कुठल्याही प्रकारचे दावा, हरकती, जसे विक्री, बोजा, दान, गहाण, सरकारी निमसरकारी, कंपनी बक्षीस भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन किंवा इतर काही असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत या भुखंडाच्या संबंधित कागद पत्रासोबत माझ्या कार्यालयीन पत्यावर संपर्क साधावा. अन्यथा सदर भुखंडाच्या त्रिपक्षिय करारनाम्याद्वारे हस्तांतरण करण्याची प्रक्रीया पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या कुठल्याही प्रकारच्या हरकती/तक्रारीचा विचार करण्यात येणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

**सही/-**

**ॲड. निरंत वासुदेव पाटील**

कार्यालय :- तळ मजला, प्लॉट नं. बी-४०, सेक्टर -२०, अष्टविनायक बिल्डींग, नेरूळ गाव, नवी मुंबई-४००७०६. मो. ९३२४५६९८०६



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | **Tender No. & Name of Tender** | **RFx No. 7000027415** **Tender No.:** EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-28/2023-2024. RFx E-Tender for Providing the Services of LDC cum Computer Typist, Peon and Driver at various Sections under EHV (O&M) Dn., Panvel from 01.07.2023 to 31.03.2024. **Tender Amount:** Rs. 27,16,963/- **EMD Amount:** Rs. 27,170/- |
| 2 | **Online Downloading of the RFx** | 22.05.2023, 18:00 Hrs to 29.05.2023, 23:59 Hrs. |
| 3 | **Online Submission of the RFx** | On or Before 29.05.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | **Online Opening of the Techno-Commercial RFx** | 30.05.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

# विशेष जनसंपर्क अभियान यशस्वी करा

## आमदार गणेश नाईक यांचे आवाहन



**नवी मुंबई : बातमीदार**

येत्या ३० मे २०२३ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला नऊ वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या मार्गदर्शनाखाली देशभर लोकसभा मतदारसंघांमध्ये विशेष जनसंपर्क अभियान भाजाच्या वतीने हाती घेण्यात येणार असून नवी मुंबई शहर (जिल्हा) मधील या अभियानाच्या यशस्वीतेसाठी आमदार गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना लोकनेते आमदार नाईक यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

भारतीय जनता पक्षाचा लोककल्याणकारी विचार आणि जनहिताय कार्य घराघरात, शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्याचे आवाहन विशेष जनसंपर्क अभियानांतर्गत करण्याचे आवाहन त्यांनी केले. या बैठकीत माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक, महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती अनंत सुतार, माजी स्थायी समितीचे सभापती नवीन गवते, माजी नगरसेविका माधुरी सुतार, माजी नगरसेविका भारती पाटील, माजी नगरसेविका शशिकला पाटील यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारला ९ वर्षे पूर्ण होत असल्याबद्दल ३० मे २०२३ ते ३० जून २०२३ या कालावधीमध्ये विशेष जनसंपर्क अभियान देशभरात राबविण्यात येणार असल्याची माहिती लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी याप्रसंगी दिली. १९ मे २०२३ रोजी पुणे येथे झालेल्या राष्ट्रीय कार्य समितीच्या अधिवेशनामध्ये विशेष जनसंपर्क अभियानाबाबत पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना अवगत करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम नेतृत्वाखाली देश विकास करतो आहे. जगामध्ये देशाची प्रतिष्ठा वाढली आहे. देशाचा सांस्कृतिक वारसा विश्वामध्ये पोहचला असून आर्थिक महासत्ता होण्याच्या दिशेने भारताची वाटचाल सुरू आहे, असे लोकनेते नाईक म्हणाले. विशेष जनसंपर्क अभियानाच्या माध्यमातून लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघात बुथ स्तरावर व्यापक जनसंपर्क ,सरकारी योजनांचे लाभार्थी संपर्क, समाजातील विविध घटकांशी संपर्क, ज्येष्ठ कार्यकर्त्यांशी संपर्क साधण्यात येणार आहे.

मोदी सरकारच्या कल्याणकारी योजनांचा देशातील करोडो नागरिकांना लाभ झाला आहे त्या योजना व्यापक स्तरावर जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत. भारतीय जनता पक्ष हा कार्यकर्त्यांचा आणि जनतेशी नाळ जोडलेला पक्ष आहे. जनसंपर्कातून जनतेच्या कथा आणि व्यथा आपल्याला जाणून घेता येतात आणि त्याची सोडवणूक आपल्याला करता येते.

### भाजपच्या मजबूतीसाठी सर्वांनी योगदान द्या!

**केंद्रामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा त्याचबरोबर राज्यामध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्ष ताकदीने काम करत असल्याचे प्रतिपादन लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी केले. त्याचबरोबर पक्षाला मजबूत करण्यासाठी सर्वांनी आपले पूर्ण योगदान देण्याचे आवाहन कार्यकर्त्यांना केले.**

# पावणेतील आदिवासीपाड्यात पाणीटंचाई

## नागरिकांची वणवण



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

स्वतःच्या मालकीचे धरण असलेली जल संपन्न शहर अशी बिरुदावल्या लाभलेल्या नवी मुंबई शहरात आजही पावणे एमआयडीसीतील आदिवासी पाड्यांना पाण्यासाठी रखरखत्या उन्हात एक ते दीड किलोमीटर पायपीट करावी लागत आहे. महापालिकेच्या पाण्याच्या नियोजन शून्य कारभारामुळे पाण्याविना नागरीकांचे प्रचंड हाल होत आहेत. एमआयडीसीकडून पाणीपुरवठा केला जातो, मात्र अनियमित, कमी दाबाने पाणीपुरवठा होतो, परिणामी नागरिकांची पाण्यासाठी तारांबळ उडते.

पावणेतील वारली पाडा येथील आदिवासींना महापालिकेने वाल्मीकी आवास योजनेतून घरे बांधून दिली आहेत. घरे बांधून पडूनच होती,परंतु मागील सात वर्षांपूर्वी याठिकाणी आदिवासी नागरिकांना स्थलांतर करण्यात आले, मात्र स्थलांतर करताना येथील नागरिकांना महापालिकेतर्फे पाण्याची सोय उपलब्ध केले जाईल असे आश्वासन दिले होते. परंतु प्रत्यक्षात येथील रहिवाशांना आजही जलसंपन्न शहरात पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. नवी मुंबई शहराकडे स्वतःच्या मालकीचे धरण आहे, मात्र दिघा,महापे, तुर्भे झोपडपट्टी भागात एमआयडीसी मार्फ़त पाणीपुरवठा केला जातो.

अनियमित, कमी दाबाने पाणीपुरवठा होतो. वारली पाडा याठिकाणी पाण्याची टाकी आणि घरोघरी नळ जोडणी देण्यात आलेली होती, परंतु वर्षानुवर्षे बांधून दिलेली घरे बंद असल्याने येथील नळ जोडणीला आतून गंज लागलेला आहे . त्यामुळे हे पाणी पिण्यासाठी अयोग्य असल्याचे येथील रहिवाशांचे म्हणणे आहे. पिण्याच्या पाण्यासाठी येथील रहिवाशांना जुन्या वारली पाड्यातून पाणी आणावे लागत आहे. नाहीतर एक ते दीड किलोमीटर असलेल्या फुटलेल्या जलवाहिणीचा आधार घ्यावा लागत आहे. सध्या उन्हाचा तडका वाढला असून पाण्याची गरज अधिक भासते, मात्र या रखरखीत उन्हात येथील रहिवाशांना पाण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे.

**वारली पाडा येथील नागरिकांना एमआयडीसीतून पाणीपुरवठा केला जातो, मात्र एमआयडीसीमधील पाणीपुरवठा कमी दाबाने आणि अनियमित असल्यामुळे पाण्याची टंचाई भासते. पाण्यासाठी इतर ठिकाणी येथील रहिवाशांना पायपीट करावी लागते. महापालिकेने पाणीपुरवठा करावा याबाबत सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.**

**–शशी भोईर,**
**माजी नगरसेवक**

# नवी मुंबईत थ्री आर सेंटर्सची ९२ केंद्र कार्यान्वित




**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छतेच्या अनुषंगाने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यामध्ये नवी मुंबई नेहमीच आघाडीवर राहिलेली असून महानगरपालिकेने राबविलेल्या अनेक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांची दखल राज्य व राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आलेली आहे. अशाच प्रकारचा एक अभिनव उपक्रम 'नको असेल त्या द्या आणि हवे असेल ते घ्या' या शिर्षकांतर्गत मागील तीन वर्षांपासून शहरात तब्बल ९२ ठिकाणी स्थापित 'थ्री आर' केंद्राद्वारे यशस्वीरित्या राबविला जात आहे. या उपक्रमाला नवी मुंबईकर नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिल्याने प्रसारमाध्यमांनीही या अभिनव उपक्रमाचे वेळोवेळी कौतुक केले आहे.

आता केंद्र सरकारने 'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत 'माझे जीवन, माझे स्वच्छ शहर ' या १५ मे पासून ५ जूनपर्यंत राबविल्या जाणा–या राष्ट्रीय स्वच्छता उपक्रमात '२१ दिवस चॅलेंज' अंतर्गत 'थ्री आर सेंटर्स' कार्यान्वित करण्याचे सूचित केले असून संपूर्ण देशभरातील शहरांमध्ये याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. नवी मुंबई महापालिका याबाबत आधीपासूनच जागरूक असल्याने महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र सरकारच्या 'माझे जीवन, माझे स्वच्छ शहर अभियानांतर्गत '२१ दिवस चॅलेंज' मध्ये या ९२ थ्री आर सेंटर्सचे पुनर्नियोजन करण्यात आले आहे.

५ जून पर्यंत चालणाऱ्या या अभियानाच्या अनुषंगाने शहरातील सर्व ९२ थ्री आर सेंटर्सच्या सुयोग्य व्यवस्थापनासाठी बिंदुरा फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेच्या सहयोगाने कार्यप्रणाली तयार करण्यात आलेली आहे. आहे. त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यास २० मे पासून सुरूवात करण्यात आली.

या वेळी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त शशिकांत तांडेल, स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांच्यासह बिंदुरा फाऊंडेशनच्या अध्यक्ष ॲड बिंदु दुबे, सचिव कमलेश दुबे, प्रकल्प प्रमुख ॲड विनू मिश्रा व शैलेश दुबे आणि संस्था प्रतिनिधी तसेच महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### मानवतेचे देणे–घेणे

**शून्य कचरा हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून नवी मुंबई महापालिका सातत्याने नवनवे उपक्रम राबवित असून त्यांना येथील स्वच्छताप्रेमी जागरूक नागरिकांचा उत्साही सहभाग मिळत असल्याने सर्व उपक्रम यशस्वी होतात व स्वच्छता कार्याला गती मिळते. हा 'थ्री आर' सेंटर्सचा उपक्रमही 'आहे रे' वर्गाला, 'नाही रे' वर्गाशी जोडणारा असल्याने या थ्री आर सेंटरला 'मानवतेचे देणे – घेणे' असे अत्यंत समर्पक शिर्षक देण्यात आलेले आहे.**

### नागरिकांचा उपक्रमाला चांगला प्रतिसाद

**घनकचरा व्यवस्थापनामध्ये कचरा कमी करणे कचऱ्याचा पुनर्वापर करणे व कचऱ्यावर पुनर्प्रक्रिया करणे अशी 'थ्री आर' ही अत्यंत महत्त्वाची संकल्पना आहे. नवी मुंबई महापालिका क्षेत्रात इतर कोणत्याही शहराच्या तुलनेत अधिक ९२ इतक्या मोठ्या संख्येने थ्री आर केंद्रे चांगल्या रितीने सुरू असून त्याला वस्तू देणारांचा आणि घेणारांचा उत्तम प्रतिसाद मिळताना दिसत आहे.**

**केवळ ५ जून या उपक्रम कालावधीपुरते नाही तर स्वच्छता ही नियमित करण्याची गोष्ट असल्याने नवी मुंबईकर नागरिकांनी आपल्याला नको असणाऱ्या निरूपयोगी वस्तू आपल्या घराजवळच्या थ्री आर सेंटर्समध्ये आणून ठेवाव्यात आणि त्या गरजूंच्या उपयोगी पडतील याची खात्री बाळगावी.**

**–राजेश नार्वेकर,**
**आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

# दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिनानिमित्त नवी मुंबई महापालिका मुख्यालयात प्रतिज्ञा




**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका मुख्यालयातील म्फिथिएटरमध्ये दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिनानिमित्त घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांच्या समवेत उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांनी दहशतवाद व हिंसाचारविरोधी सामुहिक प्रतिज्ञा ग्रहण केली.

या वेळी माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पमालिका अर्पण करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. आम्ही, भारताचे नागरिक, आपल्या देशाच्या अहिंसा व सहिष्णूतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून याद्वारे, सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा आमच्या सर्व शक्तीनिशी मुकाबला करण्याची गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करीत आहोत अशी प्रतिज्ञा घेत महापालिका अधिकारी, कर्मचारीवृंदाने आम्ही प्रतिज्ञा करतो की, आम्ही सर्व मानवजातीमध्ये शांती, सामाजिक एकोपा आणि सामंजस्य टिकवू व वर्धिष्णू करू, तसेच मानवी जीवित आणि मूल्य धोक्यात आणणाऱ्या विघटनकारी शक्तीचा प्रतिकार करू असा प्रतिज्ञेचा मजकूर सामुहिकरित्या म्हटला.

# इनऑर्बिट मॉलमध्ये 'समर फिएस्टा'

**नवी मुंबई : बातमीदार**

उन्हाळा हा कुटुंबासोबत अधिक चांगल्या रीतीने जोडण्यासाठी योग्य वेळ आहे. मुलांच्या शाळेला सुट्ट्या आहेत आणि पालक त्यांच्या मुलांसोबत आनंद घेण्यासाठी सतत रोमांचक अनुभव शोधत असतात. त्यानुसार नवी मुंबईतील लोकांसाठी वाशीच्या इनऑर्बिट मॉल येथे १९ मे ते ११ जून या कालावधीत 'समर फिएस्टा' आयोजित करण्यात आला आहे.

ज्याचा उद्देश काही मजा आणि खेळांसाठी कुटुंबे आणि मित्रांना एकत्र आणणे हा आहे. हा तीन आठवडे चालणारा जल्लोष मॉलच्या मुख्य आट्रीयममध्ये होणार आहे आणि पाच वर्षे आणि त्याहून अधिक वयाचे प्रत्येकजण याचा आनंद घेऊ शकतात. मुलांना निवड करणे कठीण जाईल कारण त्यांना रोमांचक गेम झोन अनुभवायला मिळतील ज्यात नेहमीचे आवडते पीएस४ प्रो स्टेशन, एक मनाला आकर्षित करणारा चक्रव्यूह, एक रोमांचकारी मेकॅनिकल सर्फिंग बोर्ड आणि एक मोठ्या आकाराची स्लाइड यांचा समावेश होतो. याव्यतिरिक्त, महिन्याच्या शनिवारी आणि रविवारी, ते मॉलमध्ये उपस्थित टॅटू कलाकाराने बनवलेले मजेदार टॅटू बनवू शकतात. इतकेच नाही तर येणारे ग्राहक 'स्पिन द व्हील' गेम खेळू शकतात आणि मॉलच्या पार्टनर ब्रँडकडून आकर्षक भेटवस्तू आणि व्हाउचर मिळवू शकतात. तसेच, मिस्टर डीआयवाय, मॅक्स आणि ज्यूस सलून सारखे ब्रँड हा प्रसंग आणखी आनंददायक बनवण्यासाठी विशेष सवलती आणि भेटवस्तू देत आहेत.

# नवी मुंबई महापालिका विभाग कार्यालयांमधील कामकाजाचा आढावा



**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेशी संबंधित कामांबाबत नागरिकांचा नियमित संपर्क विभाग कार्यालयांशी असतो. त्या अनुषंगाने विभाग कार्यालयामध्ये जाऊन तेथील कामकाजाचा प्रत्यक्ष आढावा घेण्यास नवी मुंबई महापालिकाआयुक्त राजेश नार्वेकर यांनी सुरुवात केली असून त्यांनी बेलापूर विभाग कार्यालयाचा प्रत्यक्ष भेट देऊन आढावा घेतला.

या वेळी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व संजय काकडे, प्रशासन विभागाचे उपआयुक्त मीटिंग नार्वेकर, शहर अभियंता शा संजय देसाई, उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, डॉ. अमरिश पटनिगिरे, सोमनाथ पोटरे, अनंत जाधव, दिलीप नेरकर, अतिरिक्त शहर अभियंत मनोज पाटील व शिरीष आरदवाड आणि सर्व विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी व कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

विभाग कार्यालयांसाठी महापालिकेच्या आकृतीबंधात मंजूर झालेला अधिकारी, कर्मचाऱ्यांचा आराखडा जाणून घेत प्रत्यक्षात विभाग कार्यालयात कार्यरत असलेल्या विविध विभागाच्या कर्मचाऱ्यांची आयुक्तांनी बारकाईने माहिती घेतली. प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांच्या कामाचे स्वरुप जाणून घेत आयुक्तांनी सर्वच विभाग कार्यालयातील विद्यमान स्थितीची माहिती घेतली.

बेलापूर विभागात सद्यस्थितीत सुरू असलेल्या कामांची माहिती घेत आयुक्तांनी किती कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण होणार याचीही माहिती जाणून घेतली. पावसाळा कालावधीच्या अनुषंगाने बेलापूर विभागात सुरु असलेल्या नालेसफाई, बंदिस्त गटारे सफाई, मलनि:स्सारण वाहिन्या सफाई कामांचा आयुक्तांनी परिसरनिहाय आढावा घेतला व काम झाल्यावर त्याठिकाणची झाकणे व्यवस्थित लावली जातील याची काळजी घेण्याचे निर्देश दिले. या कामाची जबाबदारी संबंधित भागाचा कनिष्ठ अभियंता व स्वच्छता अधिकारी यांच्यावर निश्चित करण्याच्या सूचनाही आयुक्तांनी यावेळी केल्या. नालेसफाई कामांची सद्यस्थिती जाणून घेताना ही कामे विहित कालावधीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने खबरदारी घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले. विशेषत्वाने सेक्टर ४, ५, ६ येथील नाल्याची सफाई अधिक काळजीपूर्वक करण्याचे निर्देश देत त्याठिकाणी २–४ दिवसात कामाची प्रत्यक्ष पाहणी करणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

विभागातील इलेक्ट्रीकल डिपी यांचे दरवाजे व्यवस्थित बंद असतील तसेच उघड्या केबल्स झाकलेल्या असतील याची खात्री विभागातील विद्युत अभियंता यांनी करून घ्यावी व एमएसईडीसीएल मार्फत आवश्यक कामे करून घ्यावीत असेही आयुक्तांनी निर्देशित केले.

नागरिकांच्या सोयीसाठी विभाग कार्यालयांमध्ये सुरु असलेल्या नागरी सुविधा केंद्रातील उपलब्ध सेवांची माहिती घेत नागरिकांना विभाग कार्यालयात येण्याची गरजच भासू नये अशाप्रकारे अधिकाधिक सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे निर्देश आयुक्तांनी संगणक विभागाला दिले.

# नवी मुंबईच्या खाडी किनाऱ्यांवर फ्लेमिंगोंची गर्दी



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पांढ्र्या शुभ्र रंगाचे, गुलाबी पंखांचे, बाकदार चोच आणि लांब पाय अशा सुंदर वर्णनाचे अग्निपंख असणाऱ्या फ्लेमिंगो (रोहित) पक्ष्यांनी सध्या नवी मुंबईकरांना भुरळ पाडली आहे. नवी मुंबईचे खाडी किनारे परदेशी पक्ष्यांनी फुलून गेले असल्याने शहराच्या सभोवताली गुलाबी रंगाची झालर निर्माण झाली आहे. या पक्ष्यांना पाहण्यासाठी नागरिक खाडी किनाऱ्यांवर गर्दी करत असून पक्षी अभ्यासकांसाठीही पर्वणी ठरत आहेत.

मूळच्या आखाती देशातून येणारा हा पक्षी लाखो मैल प्रवास करून नवी मुंबईच्या खाडी–किनारी स्थिरावला आहे. हिवाळा सुरू होण्यापूर्वीच ऑक्टोबर महिन्यापासून रोहित पक्षी खाडी किनारी येण्यास सुरुवात होते. सहा ते सात महिने मुक्काम केल्यानंतर हे पक्षी आता परतीच्या प्रवासाकडे निघणार आहेत. मात्र, त्यांची दरवर्षी वाढत जाणारी संख्या सर्वांनाच आश्चर्याचा धक्का देणारी आहे. फ्लेमिंगोंचे मुख्य खाद्य असलेले शेवाळ इथल्या उष्ण वातावरणात चांगले वाढते. अन्नाच्या शोधात भटकणाऱ्या या पक्ष्यांना इथे मुबलक अन्न उपलब्ध होत असल्याने त्यांची संख्या सातत्याने वाढत असल्याचे पक्षी निरीक्षक सांगतात. सीबीडी–बेलापूरच्या एनआरआय कॉलनी मागील खाडी किनारी, डीपीएस शाळा तलाव, टीएच चाणक्य मरिन अकादमीच्या पाठीमागील बाजूस, नेरूळ खाडी, वाशी, कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली, मुलुंड खाडीपर्यंत असलेल्या कांदळवनांमध्ये या पक्ष्यांनी संसार थाटले आहेत.

फ्लेमिंगो पक्षी पाहण्यासाठी नवी मुंबई महापालिकेने काही खाडी किनारी विव्हिंग गॅलरी उभारलेल्या आहेत. या गॅलरीतील उंचीवरून रोहित पक्ष्यांचे विहंगम दृश्य दिसते. पक्षी निरीक्षणासाठी सोयीचे असल्याने नागरिकांकडून पसंती मिळत आहे.

### परदेशातून पक्ष्यांचे स्थलांतर

***युरोप, आफ्रिका, आशियात आढळणारा कॉमन रेडशान्क (सामान्य टीलवा), आयर्लंड येथे आढळणारा ब्लॅक टाईल्ड गॉडविट (शेपटीचा पाणटीळवा), इंग्लंड व युरोपियन देशांत आढळणारा युरेशियन कुरव, युरोप, मध्य व पश्चिम आशिया, आफ्रिका व दक्षिण आशिया दिसणारा पेड एव्होसेट (उचाट्या), अंटार्टिका सोडून सर्व खंडांमध्ये सामान्यपणे आढळणारा व घारीप्रमाणे दिसणारा ओसप्रे (कैकर), उत्तर युरोप, उत्तर अमेरिका, आशियामध्ये दिसणारा नॉर्थ शॉवेलर (थापट्या) आदी प्रवासी पक्षी नवी मुंबईतील खाडी किनाऱ्यांवर येण्यास सुरुवात झाली आहे.***

# शासन आपल्या दारी!

## पशुसंवर्धन दिनानिमित्त सुधागडमध्ये मार्गदर्शन शिबिर

**सुधागड : प्रतिनिधी**

पशुसंवर्धन दिनाचे औचित्य साधून शनिवारी (दि. २०) सुधागड तालुक्यात शासन आपल्या दारी उपक्रम राबविण्यात आला. या अंतर्गत सहा पशुवैद्यकीय संस्थेतील फल्याण, राबगाव ठाकूरवाडी, गोंदाव, गोमाशी, खवली व वाघोशी गावात वंध्यत्व निवारण शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये उन्हाळ्यात पशुधनाची काळजी व पशुसंवर्धनविषयक सुधारित व्यवस्थापन पद्धती, विभागाच्या योजना व उपक्रम याबाबत माहिती देण्यात आली.





या वेळी उपस्थितीत पशुपालकांना वंध्यत्व तपासणी व गर्भधारणा तपासणी, खनिज मिश्रणे, जंतनाशक औषधे, कॅल्शिअम वाटप, चारा बियाणे वाटप करून जनावरांचे व्यवस्थापन करण्याबाबत माहिती देण्यात आली. गोमाशी येथील कार्यक्रमात सरपंच भूषण सुतार, माजी उपसरपंच शरद जंगम, जगदीश सुतार, जितेंद्र खैरे, पशुपालक पुरुषोत्तम सुतार, सोमनाथ जंगम, बाळू जंगम, बबन मोहने, प्रमोद जंगम, मंगेश मगर आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त रत्नाकर काळे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी शामराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सुधागड तालुका पशुधन विकास अधिकारी (विस्तार) डॉ. प्रशांत कोकरे व संस्था प्रमुख प्रशांत वारगुडे, चंद्रकांत बरगे, ऋषी पिसे, भक्ती गुंड, वाळक्या वारगुडे व सुनील कदम यांनी तालुक्यातील शिबिर यशस्वी होण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

### ▌आता पशुसंवर्धन मुख्य व्यवसाय

*पशुसंवर्धन विभागाच्या स्थापनेस या वर्षी १३१ वर्षे पूर्ण होत आहेत. शेतकरी पशुपालक यांना स्वयंरोजगाराच्या संधी प्राप्त होऊन त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढण्यास या विभागाचा मोठा वाटा आहे. पशुसंवर्धन व्यवसायामुळे शेतकऱ्यांना आता बाराही महिने पूरक व्यवसाय शक्य आहे तसेच आपला आहार सकस व संतुलित असण्याच्या दृष्टीने दूध, अंडी व मांस यांसारखी पशूजन्य उत्पादने आवश्यक असल्याने पशुसंवर्धन जोडधंद्याऐवजी आता मुख्य व्यवसाय होऊ पाहत आहे, असे या वेळी तालुका पशुधन विकास अधिकारी (विस्तार) डॉ. प्रशांत कोकरे यांनी सांगितले.*

# समस्यांवर मात करीत पोलीस बनण्याचे स्वप्न पूर्ण

## कर्जतमधील कामिनी शेळकेची यशोगाथा

**कर्जत : प्रतिनिधी**

घरची परिस्थिती बेताची असल्याने मुलांना शिकवावे कसे आणि पोटाची खळगी भागवावी कशी, असा प्रश्न ज्या कुटुंबाला सतत पडलेला असायचा त्याच कुटुंबातील मुलगी पोलीस भरती परीक्षा उत्तीर्ण झाली. बाबा मला एक संधी द्या, असे म्हणत एका सर्वसामान्य कुटुंबातील मुलगी कामिनी रामदास शेळके हिने मिळविलेल्या या यशामुळे कुटुंबीयांसह ग्रामस्थांनी जल्लोष साजरा केला.

आठ जणांचे मोठे कुटुंब, त्यात वडील रामदास शेळके पेंटिग काम करीत आपल्या कुटुंबाचा गाडा सांभाळतात, तर आई गृहिणी आहे. चौघी बहिणी शिक्षण घेत असताना आपला शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी होणारी आई-वडिलांची धडपड हे सर्व बघवत नव्हते. ही परिस्थिती बदलावयाची असेल तर आपल्याला अभ्यास करून मोठे व्हावे लागेल. अशी जिद्द, चिकाटी अन् कठोर मेहनत उराशी बाळगून तळवडे येथील कामिनी शेळकेने महाराष्ट्र पोलिसांच्या मुंबई येथील परीक्षा पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण होत पालकांचे स्वप्न पूर्ण केले आहे. तिच्या या यशामुळे आई-वडिलांना आकाश ठेंगणे झाले असून आमच्या कष्टाचे चीज झाल्याचे ते मोठ्या गर्वाने सांगत आहेत.



कर्जत तालुक्यातील तळवडे खुर्द गावात रामदास शेळके व मालती शेळके हे दाम्पत्य वास्तव्यास आहे. रंगकामातून येणाऱ्या कमी अधिक उत्पन्नातून हे दाम्पत्य घरखर्च व आपल्या चार मुलींच्या शिक्षणाचा खर्च भागवित आहेत. घरातील मोठी मुलगी म्हणून या सर्व परिस्थितीची जाणीव पोलीस भरती परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कामिनीला होती. त्यामुळे लहानपणापासूनच तिने अभ्यासात चिकाटी ठेवली. जिल्हा परिषदेच्या नेरळ विद्यामंदिर शाळेत शिक्षण घेत दहावीला ८४ टक्के गुण मिळवले. त्यांनतर बारावी वाणिज्य शाखेत ७८ गुण मिळवून कोकण विद्या भवन महाविद्यालयात पदवीचे शिक्षण घेण्यास सुरुवात केली. शालेय शिक्षण घेत असतानाच कामिनीने रग्बी खेळण्याचा छंद जोपासला. या खेळाची आवड तिला राज्यस्तरीय स्पर्धांपर्यंत घेऊन गेली.

> **आई वडिलांचे कष्ट, मामाचे सहकार्य, शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे मला प्रेरणा मिळाली. आजच्या या निकालातून निश्चितपणे आईवडिलांचे स्वप्न पूर्ण झाले आहे.**
>
> **-कामिनी शेळके**

अभ्यासाबरोबरच मैदानी खेळांमधील कामिनीची कामगिरी वाखाणण्याजोगी होती. त्यामुळे पोलीस भरतीसाठी प्रयत्न करावे असा विचार तिच्या मनात आला. त्यानंतर मनाशी खूण गाठ बांधत वासिंद येथे संघर्ष पोलीस अकॅडमीमध्ये पोलीस भरतीचे प्रयत्न सुरू केले. एक वर्ष अथक परिश्रमांनंतर पोलीस भरतीची ७ मे रोजी परीक्षा दिली. या परीक्षेचा निकाल लागला व कामिनीने उत्तीर्ण होऊन स्वप्नपूर्ती केली.

# महिलेचा विनयभंग; तरुणावर गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

एका गृहिणीशी असभ्य वर्तन करीत तिचा विनयभंग केल्याप्रकरणी २७ वर्षीय तरुणावर महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील काकरतळे भागातील शिवलिंग अपार्टमेंटमधील जिन्यात ही घटना घडली.




या प्रकरणी पीडित महिलेने महाड शहर पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केली आहे. पीडित महिला ही तालुक्यातील नांगलवाडी येथील रहिवासी असून १८ मे रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास ती शिवलिंग अपार्टमेंटमधील सि विंगच्या जिन्यातून खाली उतरत असताना सौरभ विजय शिर्के (वय २७, रा. काकरतळे) याने या महिलेशी असभ्य वर्तन केले. या महिलेने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर तरुणावर विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून याबाबत अधिक तपास सुरू आहे.

# महाडजवळ अपघातात माजी सरपंच ठार





**महाड : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर महाडनजीक दुचाकी आणि कारमध्ये झालेल्या अपघातात दुचाकीस्वार काळीज खरवली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच प्रमोद म्हामुनकर जागीच ठार झाले. हा अपघात रविवारी (दि. २१) सकाळी साडेअकराच्या सुमारास झाला.

महाड सुंदरवाडी येथे बी. एस. बुटाला सभागृहासमोर महामार्गावर प्रवेश करीत असलेली दुचाकी आणि महामार्गावरून धावणाऱ्या कार यांचा अपघात झाला. यात तालुक्यातील काळीज खरवली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच प्रमोद महामुणकर गंभीर जखमी झाले. त्यांना महाड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. अपघातातील कार मुंबईच्या दिशेने जात होती, तर म्हामुणकर हे आपल्या दुचाकीवरून बिरवाडी येथे घरी जात असतानाच हा अपघात झाला.

# कर्जतकरांच्या रेल्वे समस्या सोडविण्याची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक नरेश ललवाणी व त्यांची टीम कर्जत स्थानकावर परिसरात सुरू असलेल्या कामांची पाहणी करण्यासाठी आले होते. या वेळी कर्जतकरांच्या समस्या व मागण्यांचे निवेदन सामाजिक कार्यकर्ते पंकज ओसवाल यांनी दिले.

या वेळी ओसवाल यांना कर्जत रेल्वेस्थानकावर कोरोनापूर्वी ज्या मेल एक्स्प्रेस गाड्याचा थांबा होता तो पुन्हा त्वरित सुरू करावा. पुण्याहून येणाऱ्या प्रत्येक गाडीचा थांबा कर्जत येथे द्यावा. पनवेल-कर्जत, कर्जत-लोणावळा व खोपोली, कर्जत ते कल्याण किंवा ठाणे अशा गाड्या सुरू कराव्यात, अशा विविध मागण्यांचे निवेदन महाव्यवस्थापक नरेश ललवाणी यांना दिले.

# शिक्षकांच्या ग्रुपकडून सेवानिवृत्तांचा सत्कार



**मुरुड : प्रतिनिधी**

मे महिन्यात नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांचा 'यह है दोस्ती यारो' या शिक्षकांच्या ग्रुपने यथोचित सत्कार केला. हा ग्रुप शिक्षकांच्या सुखदुःखात उभे राहण्याच्या दृष्टीने निर्माण झाला असून सेवानिवृत्तीनंतरही परस्परांतील संपर्क व जिव्हाळा अबाधित ठेवण्याची भूमिका बजावणार असल्याचे या वेळी सांगण्यात आले.

कामाप्रति निष्ठा ठेवून काम करणाऱ्या असंख्य शिक्षकांपैकी अनेक गुणवंत शिक्षक शासकीय पुरस्कारापासून दूर राहतात. त्यापैकीच अष्टपैलू व्यक्तिमत्त्व संतोष गावंड, सुनील माळवी आणि सुधीर म्हात्रे या शिक्षकांचा सेवानिवृत्तीनिमित्त शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र भेट देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना संतोष गावंड यांनी गहिवरुन आल्याची भावना व्यक्त करून एक जन्मच नाही, तर या पुढील प्रत्येक जन्मातही विद्यार्थीहित घडवणाऱ्या शिक्षकाची भूमिका पार पाडण्याचा मनोदय व्यक्त केला.

रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष राजा म्हात्रे, उपाध्यक्ष नरेंद्र गुरव, विनोद कवळे यांनी विद्यार्थ्यांसाठी आयुष्यभर घेतलेली मेहनत हेच खरे शिक्षकाचे बँक बॅलंस असते, असे सांगून विविध क्षेत्रांत नाव कमावलेल्या विद्यार्थ्यांचे किस्से सांगितले. या वेळी विश्वास पाटील या गुणवंताचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

अलिबाग तालुका शिक्षक संघटना अध्यक्ष प्रमोद भोपी, मुरूड तालुका अध्यक्ष धनंजय म्हात्रे, उपाध्यक्ष महेश कवळे, ज्ञानगंगा शिक्षक ट्रस्टचे अध्यक्ष वैभव पिंगळे, सचिव सुबोध पाटील,विलास पाटील, नागाव केंद्रप्रमुख जयवंत वाणी, देवीदास थळे, रमेश धुमाळ, चेतन कोळी, रवींद्र ठोंबरे, सुनील पाटील, शशीकांत मोकल, राजेंद्र पाटील,नित्यनाथ म्हात्रे, शेखर कडवे, श्रीकांत मुंगळे व शिक्षक बांधव उपस्थित होते.

# जयेश चव्हाणचे 'दिल बेधुंद'; नव्या चित्रपटात रामण्णाची भूमिका लक्षवेधी

**पाली : प्रतिनिधी**

'टाईमपास' चित्रपटाममधून प्रेक्षकांची मने जिंकणारा मलेरिया दादुस अर्थात अभिनेता जयेश चव्हाण आता 'दिल बेधुंद' या चित्रपटातून प्रेक्षकांचे मनोरंजन करीत आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटात तो रामण्णा हे साऊथ इंडियन पात्र साकारत आहे. जयेश रायगड जिल्ह्यातील पनवेलचा रहिवासी आहे.

आपल्या भूमिकेविषयी जयेश म्हणाला, रामण्णा हा राजचा (हंसराज जगताप) जिगरी दोस्त आहे. रामण्णाशिवाय राजचे पान हलत नाही. राज कुठल्याही संकटात असला तर त्यावर रामण्णाकडे १०१ उपाय असतात. त्याच उपायामुळे राजच्या आयुष्यात काय गंमतीजमती घडतात हे चित्रपटात पहायला मिळते.



'टाईमपास' चित्रपटात जयेश आगरी बोलीभाषा बोलताना दिसला होता. 'दिल बेधुंद' चित्रपटात तो साऊथ इंडियन लहेजात बोलताना दिसतो. त्यासाठी त्याने 'चंगू मंगू' या मराठी चित्रपटातील अशोक सराफ यांच्या पात्राचा संदर्भ घेतला आहे.

हंसराज जगताप आणि साक्षी चौधरी यांची केमिस्ट्री चित्रपटात पहायला मिळत आहे. या दोघांसमवेत जयेश चव्हाण, आरती कुथे, नितीन पात्रीकर, प्रदीप रोंगे, संयोनी मिश्रा, धीरज तरुणे आणि गोविंद चौरसिया यांच्याही चित्रपटात भूमिका आहेत.

दिल बेधुंद हा चित्रपट १९ मे रोजी महाराष्ट्रातल्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला आहे. ओशियन कर्व्हज एंटरटेन्मेंटच्या बॅनरखाली तयार झालेल्या या चित्रपटाचे निर्माते शिवम पाटील आहेत. संतोष फुंडे यांनी चित्रपटाचे दिग्दर्शन केले असून गुड्डू देवांगन यांनी कथा लिहिली आहे.

# कुशल मनुष्यबळ निर्मितीतून रोजगार देणारा कौशल्य, उद्योजकता विभाग

**कुठल्याही योजनेचे यश हे लोकाभिमुखता, पारदर्शकता व सुलभ कार्यप्रणालीवर अवलंबून असते. सर्वसामान्यांची कामे सुलभरित्या व स्थानिक पातळीवर होणे आवश्यक असते. शासन प्रत्येक क्षेत्रात विकासाच्या अनेक योजना राबवित असते. गरजूंसाठी तो आधार तर असतोच त्याचप्रमाणे सामूहिक विकासप्रक्रियेलाही त्यातून गती मिळत असते. हे लक्षात घेऊन नागरिकांना विविध योजनांचे थेट लाभ मिळावेत यासाठी शासनाने शासन आपल्या दारी हा एक महत्त्वाकांक्षी विशेष उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत विविध शासकीय योजनांची जिल्हा माहिती कार्यालयामार्फत प्रसिध्द्धी करण्यात येत असून काय आहेत शासकीय योजना.. जाणून घेऊ या लेखातून...**

मनुष्यबळाचे कौशल्य विकसित करून त्यांना मागणी असलेल्या क्षेत्रात रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे,त्याद्वारे परिवार व समाजाचा एक उत्पादक सदस्य म्हणून सन्मानाने भावी आयुष्य समर्थपणे घडविता यावे, विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे एकात्मिक नियोजन व अंमलबाजवणीतून कुशल महाराष्ट्र-रोजगारयुक्त महाराष्ट्र हे ध्येय समोर ठेवून उद्योजकांना कुशल मनुष्यबळ पुरवून राज्याच्या अर्थव्यवस्थेचे बळकटीकरण करण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग कार्यरत आहे .

**धोरण :-** जिल्ह्यातील रोजगार व स्वयंरोजगाराच्या मागणीनुसार कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन कुशल मनुष्यबळ निर्माण करणे तसेच युवकांच्या नाविन्यपूर्ण नवसंकल्पनांना वाव देण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे.

**विभागाची उद्दिष्टे :-** कौशल्य विकास प्रशिक्षणाद्वारे उमेदवारांना रोजगार व स्वयंरोजगारक्षम बनवणे. युवकांना त्यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनांना वाव देऊन व्यासपीठ उपलब्ध करून देणे. उद्योजकांशी समन्वय साधून त्यांची नोंदणी करणे व त्यांच्या मागणीनुसार प्रशिक्षित कुशल उमेदवार पुरवणे. बेरोजगार उमेदवारांची नोंदणी करणे व त्यांना नोकरी मिळविण्यासाठी मार्गदर्शन व सहाय्य करणे तसेच व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन करणे.

**बेरोजगार उमेदवार नाव नोंदणी व रोजगार मार्गदर्शन :-** विभागाच्या पोर्टल वरून उमेदवारांना ऑनलाईन नाव नोंदणी, नोंदणीचे नूतनीकरण, पात्रतेत वाढ, पत्ता बदल इत्यादी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. उद्योजकांना रिक्त पदे अधिसूचित करणे, विवरण पत्र भरणे इ. सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेत.

**विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजना :-**

कौशल्य विकास योजना : केंद्र व राज्य शासनाद्वारे राज्यात विविध क्षेत्रात कौशल्य प्रदान करून उमेदवारांना रोजगार व स्वयंरोजगारक्षम बनविण्यासाठी व महाराष्ट्र राज्यात कौशल्य विकास सोसायटीमार्फत नियोजन, समन्वय, अंमलबजावणी आणि देखरेख करण्यासाठी विभागामार्फत विविध योजना राबविल्या जातात. त्यामध्ये प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (PMKVY) केंद्र पुरस्कृत राज्य व्यवस्थापित, NULM National Urban Livelihood Mission, प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान- PMKUV :-, किमान कौशल्य विकास कार्यक्रम (जिल्हा नियोजन समिती निधीतून), पूर्व कौशल्य ज्ञान मान्यता

**नाविन्यता :-** महाराष्ट्रात अनुकूल व्यावसायिक वातावरण निर्मिती करून नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे. स्टार्ट ऑप्सना सक्षम करण्यासाठी आर्थिक व इतर अनुषांगिक सहाय्य करणे. विविध सुविधा उपलब्ध करून स्टार्टअप्स इकोसिस्टीमला विकसित करणे. नवीन व जागतिक दर्जाचे इनक्यूबेटर्स स्थापित करणे. महाराष्ट्र व्हर्च्युअल इनक्यूबेटर्सचा विकास करणे. व्यवसाय योजना स्पर्धेसारख्या जिल्हास्तरीय कार्यक्रमांचे आयोजन करणे. कार्यशाळा व इतर संवादाद्वारे य ा धोरणाबद्दल जिल्ह्यांमध्ये जनजागृती करणे.

**रोजगार मेळावे :** ही योजना नियोक्ते आणि नोकरी शोधणाऱ्यांसाठी सुरू करण्यात आली आहे. उमेदवारांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि कोणत्याही शुल्काशिवाय नियोक्त्याला योग्य उमेदवार उपलब्ध करून देण्यासाठी नियोक्ता आणि नोकरी शोधणाऱ्यांना एकाच छताखाली आमंत्रित करणे. मनुष्यबळाच्या आवश्यकतेनुसार विविध आस्थापना/नियोक्ते/नियुक्ती करणाऱ्यांना एकाच ठिकाणी कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देते. नोकरी शोधणाऱ्यांना जागेवरच रोजगार मिळतो आणि नियोक्त्याला या रोजगार मेळावामध्ये योग्य मनुष्यबळ लगेच मिळते.

**रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम :** - Employment Promotion Programme (E.P.P.)- रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम (EPP) ही खासगी क्षेत्रातील आस्थापना/उद्योगांमध्ये नोकरी शोधणाऱ्यांना त्यांची कौशल्ये सुधारण्यासाठी आणि त्यांना रोजगारक्षम बनवण्यासाठी जप क्षेल Training देण्याची योजना आहे. ही योजना नोकरी शोधणाऱ्यांसाठी सुरू करण्यात आली. ही योजना सामान्यतः 'ईपीपी' म्हणून ओळखली जाते. या प्रशिक्षणासाठी किमान १० वी उत्तीर्ण आणि १८ वर्षे व त्यावरील वयाचे उमेदवार पात्र आहेत. प्रशिक्षण कालावधी सहा महिने असतो. प्रशिक्षणा दरम्यान उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार मासिक स्टायपेंड मिळतो.

**मॉडेल करिअर सेंटर-** जिल्ह्यातील रोजगार इच्छुक उमेदवारांना रोजगाराच्या संधी, तंत्रज्ञानाचा वापर करून उमेदवारांना व्यवसाय मार्गदर्शन, समुपदेशन आणि प्रशिक्षण उपलब्ध करून देणे. उमेदवारांची मूल्यमापन चाचणी (वर्तणूक, मानसशास्त्रीय, कौशल्य, कल इ. चाचणी) घेणे, समुपदेशन करुन रोजगार/ स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत सहाय्य करणे. तज्ञ व्यक्तींमर्फत व्यवसाय मार्गदर्शन केले जाते.

**उद्योजकताबाबत योजना :-** राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासासाठी राज्य शासनाने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची स्थापना केली आहे. त्यामार्फत स्वयंरोजगार इच्छुक उमेदवारांना स्वयंरोजगाराबाबतची माहिती, मार्गदर्शन, व आर्थिक सहाय्य केले जाते. नोकरी किंवा व्यवसाय करण्यास इच्छुक असणाऱ्या जिल्ह्यातील बेरोजगार युवक-युवतींनी या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या योजनांचा लाभ जरुर घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे, प्र. सहायक आयुक्त शा. गि. पवार यांनी केले आहे.

**- मनोज शिवाजी सानप, जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग**



# लखनऊ प्ले ऑफमध्ये!

## कोलकातावर मात; रिंकूची झुंज अपयशी



**कोलकाता : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये शनिवारी झालेल्या पहिल्या सत्रातील सामन्यात लखनऊ सुपर जायंट्सने कोलकाता नाईट रायडर्सवर एक धावेने विजय साकारला. यासोबतच लखनऊचा संघ प्ले ऑफमध्ये क्वालिफाय झाला आहे.

कोलकाताच्या ईडन गार्डनमध्ये रंगलेल्या या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर मैदानात उतरलेल्या लखनऊच्या फलंदाजांची सुरुवातीला दाणादाण उडाली, परंतु आयुष बदोनी आणि निकोलस पूरनच्या आक्रमक फलंदाजीमुळे लखनऊने २० षटकांत आठ विकेट्स गमावत १७६ धावा केल्या होत्या. त्यामुळे कोलकाताला विजयासाठी १७७ धावांचे लक्ष्य गाठावे लागणार होते. लखनऊच्या फिरकीपटूंनी अप्रतिम गोलंदाजी करीत कोलकाताच्या फलंदाजांना गुंडाळले, पण रिंकू सिंगने पुन्हा एकदा चौकार षटकारांचा पाऊस पाडत ३३ चेंडूंत सहा चौकार आणि चार षटकार ठोकून ६७ धावांची नाबाद अर्धशतकी खेळी केली. शेवटच्या चेंडूवर रिंकूने षटकार ठोकला, मात्र विजयासाठी आठ धावांची गरज होती. त्यामुळे लखनऊचा या सामन्यात एक धावेने विजय झाला.

कोलकाताचा सलामीचा फलंदाज जेसन रॉय आणि व्यंकटेश अय्यरने पॉवर प्लेमध्ये आक्रमक फलंदाजी करून कोलकाताला चांगली सुरुवात करून दिली. रॉयने २८ चेंडूंत सात चौकार आणि एक षटकार ठोकून ४५ धावांची खेळी साकारली. लखनऊचा कर्णधाक कृणाल पांड्याने रॉयला क्लीन बोल्ड करून कोलकाताला मोठा धक्का दिला. त्यानंतर कृष्णाप्पा गौतमने व्यंकटेश अय्यरला २४ धावांवर असताना झेलबाद केले. त्यानंतर कोलकाताचा कर्णधार नितीश राणाला रवी बिष्णोईने आठ धावांवर माघारी पाठवले. गुरबाज १० धावांवर यश ठाकूरच्या गोलंदाजीवर बाद झाला.

लखनऊसाठी सलामीला उतरलेला करन शर्मा स्वस्तात माघारी परतला. शर्मा ३ धावांवर असताना हर्षीत राणाच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्यानंतर क्विंटन डीकॉक आणि प्रेरक मंकडने सावध खेळी करीत धावसंख्येचा आलेख वाढवला, परंतु डीकॉक २८ धावांवर असताना वरुण चक्रवर्तीच्या फिरकीचा शिकार झाला. त्यानंतर प्रेरकही २६ धावांवर वैभव अरोराच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला.

विशेष म्हणजे लखनऊचा धडाकेबाज फलंदाज मार्कस स्टॉयनिसला या सामन्यात धावांचा सूर गवसला नाही. स्टॉयनिस वैभव अरोराच्या गोलंदाजीवर शून्यावर बाद झाला. कर्णधार कृणाल पांड्या नऊ धावांवर झेलबाद झाला, पण त्यानंतर निकोलस पूरनचा वादळ आले. आयुष बदोनीने सावध खेळी करून निकोलसला साथ दिली. बदोनीने २५, तर पूरनने ३० चेंडूंत पाच षटकार आणि चार चौकारांच्या मदतीने ५८ धावांची खेळी साकारली.

# तायक्कांदो चॅम्पियन सिरीजमध्ये रायगडच्या कराटेपटूंची चमक



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

इंडिया तायक्कांदो चॅम्पियन्स ऑफ चॅम्पियन सिरीज कुरयोगी, सब-जूनियर, कॅडेट, ज्युनिअर स्टॉप ४ महाराष्ट्र या इंडिया तायक्कांदो आयोजित स्पर्धा विभागीय क्रीडा संकुल नाशिक येथे नुकतीच झाली. यामध्ये रायगड जिल्ह्यातील तायक्कांदोचे प्रशिक्षण घेणाऱ्या कराटेपटूंनी छाप सोडत पदकांची कमाई केली. या सर्वांचे अभिनंदन होत आहे.

रसायनीतील साईराज जयवंत पाटील आणि श्लोक सचिन माळी यांनी प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करून अंतिम सामन्यात सुवर्णपदकाची कमाई केली. पनवेल येथील वीर तायक्कांदोचे स्वयंम नाईक, खंतेश वासकर यांनीही अंतिम फेरीत आपले कौशल्य दाखवून सुवर्णपदक पटकाविले. गुरुकुल तायक्कांदो अकादमीच्या श्रवण भोसले, ओमकार भोसले, राम जाधव, साई जाधव, प्रिती पाटणे यांनी सुवर्णपदक जिंकले. निहाल भोईर, मुस्तफा शेख यांनी रौप्यपदक, तर श्रीजय भगत यांनी कांस्यपदक प्राप्त केले आहे. यातील सुवर्णपदकाचे मानकरी ठरलेल्या खेळाडूंची चॅम्पियन्स ऑफ चॅम्पियन राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

गुरूकुल तायक्कांदोचे प्रशिक्षक तुषार सिनलकर आणि रोहित सिलनकर यांच्याबरोबर एटीएआरचे सेक्रेटरी सचिन माळी यांनी प्रशिक्षक म्हणून काम पाहिले. खेळाडूंच्या या कामगिरीबद्दल प्रज्ञा भगत, संजय भोईर, हरेश्वर भगत, हेमंत कोळी, संदीप भगत, निखिल भोईर व गणेश शिंदे यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आरएमएमएस चषक हॉस्पिटल क्रिकेट स्पर्धेला उद्यापासून प्रारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी व आयडियल ग्रुपतर्फे आरएमएमएस सहकार्याने क्रीडापटू गोविंदराव मोहिते यांच्या ७३व्या वाढदिवसानिमित्त आयोजित अमृत महोत्सवी आरएमएमएस चषक आंतर हॉस्पिटल टी-२० क्रिकेट स्पर्धेस २३ मेपासून प्रारंभ होत आहे. उद्घाटनीय साखळी अ गट लढत जे.जे. हॉस्पिटल विरुध्द सेव्हन हिल्स हॉस्पिटल यांच्यामध्ये मंगळवारी सकाळी ९ वाजता शिवाजी पार्क येथील माहीम ज्युवेनैल खेळपट्टीवर होईल.

क्रिकेटप्रेमी व श्री सिद्धिविनायक न्यासाचे माजी अध्यक्ष नरेंद्र राणे, क्रिकेटपटू चंद्रकांत करंगुटकर, प्रदीप क्षीरसागर, अविनाश दुधाणे व शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन होईल.

विजेतेपदाचा अमृत महोत्सवी आरएमएमएस चषक पटकाविण्यासाठी ब्रीच कॅन्डी हॉस्पिटल, नानावटी हॉस्पिटल, कस्तुरबा हॉस्पिटल, जे. जे. हॉस्पिटल, सेव्हन हिल्स हॉस्पिटल आदी संघ पूर्ण तयारीनिशी मैदानावर उतरणार आहेत. प्रथम साखळी व त्यानंतर बाद फेरीचे सामने ३१ मेपर्यंत रंगतदार होतील.

विजेत्या व उपविजेत्यांना तसेच सर्वोत्तम क्रिकेटपटू, उत्कृष्ट फलंदाज व गोलंदाज, पराभूत संघातील उत्कृष्ट खेळाडू, सामनावीर आदी आकर्षक पुरस्कार दिले जाणार आहेत.

# विजय क्लब, शताब्दी स्पोर्ट्स, सिद्धीप्रभा, गोलफादेवी उपांत्य फेरीत

**मुंबई : प्रतिनिधी**

विजय क्लब, शताब्दी स्पोर्ट्स, सिद्धीप्रभा, गोलफादेवी संघांनी शिवास इन्टरप्राईजेसने आयोजित केलेल्या कुमार गट कबड्डी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक दिली. विजय क्लब विरुद्ध शताब्दी स्पोर्टस् आणि सिद्धीप्रभा विरुद्ध गोलफादेवी अशा उपांत्य लढती होतील. मुंबई सेंट्रल, बीआयटी चाळ येथील महात्मा स्पोर्ट्सच्या पटांगणावर ही स्पर्धा सुरू आहे.




उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात विजय क्लबने आंबेवाडीचा प्रतिकार ३३-३१ असा मोडून काढला. रोहन राज, आयुष साळवी, निखिल शेट्टी यांच्या चतुरस्त्र खेळाने विजय क्लबने पूर्वार्धात २४-०९ अशी आघाडी घेतली होती. उत्तरार्धात मात्र आंबेवाडीच्या साहिल शेलार, यश माचिवले यांनी आपला खेळ उंचावत सामन्यातील चुरस वाढविली. एवढ्या शर्थीच्या लढतीनंतरदेखील आंबेवाडीला दोन गुणांनी पराभवाचा सामना करावा लागला.

शताब्दी स्पोर्ट्सने अमर मंडळाला ३३-२४ असे नमवित आपली आगेकूच सुरूच ठेवली. विश्रांतीला १५-०८ अशी आघाडी घेणाऱ्या शताब्दीने नंतर सावध खेळ करीत आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केले. विश्वा रेडियार, सुरेश कुमार शताब्दी कडून, तर विघ्नेश झावरे, रोहित शिंदे अमरकडून उत्कृष्ट खेळले. सिद्धीप्रभाने यंग प्रभादेवीला ५०-३० असे सहज पराभूत केले. मध्यांतराला २७-१६ अशी आघाडी घेणाऱ्या सिद्धीप्रभाने मध्यांतरानंतरही तोच जोश कायम राखत गुणांचे अर्धशतक गाठले. रूपेश साळुंखे, विशाल घाडगे यांच्या चढाई-पकडीच्या खेळाला या विजयाचे श्रेय जाते. यंग प्रभादेवीच्या यश पाटीलने एका चढाईत पाच गडी टिपत सामन्यात रंगत आणण्याचा प्रयत्न केला, पण संघाला विजय मिळवून देण्यात तो अपयशी ठरला.

शेवटच्या सामन्यात गोलफादेवीने यश मंडळाचे आव्हान ५४-२४ असे संपुष्टात आणले. पहिल्या डावात २३-०९ अशी आघाडी घेणाऱ्या गोलफादेवीने दुसऱ्या डावात अधिक जोशपूर्ण खेळ करीत ३० गुणांच्या मोठ्या फरकाने सामना खिशात टाकला. सनी कोळी, राज सरोज यांच्या धारदार चढाया त्याला विनम्र लाड, ओमप्रकाश पासवान यांनी भक्कम बचाव करीत दिलेली मोलाची साथ यामुळे हे शक्य झाले. यश मंडळाच्या यश पाटील, स्वरूप साजेकर यांचा प्रतिकार या सामन्यात दुबळा ठरला.

# डेव्हिड वॉर्नरने मोडला विराट कोहलीचा विक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्जने दिल्ली कॅपिटल्सचा ७७ धावांनी पराभव केला. चेन्नई या हंगामात प्ले ऑफमध्ये पोहचणारा दुसरा संघ ठरला. या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सकडून कर्णधार डेव्हिड वार्नरने सर्वाधिक धावांचे योगदान दिले, पण तो संघाचा पराभव टाळू शकला नाही. त्याने विराट कोहली आणि रोहित शर्माचा विक्रम मोडला आहे.

डेव्हिड वॉर्नरने ५८ चेंडूंत पाच षटकार आणि सात चौकारांच्या मदतीने ८६ धावांची महत्त्वपूर्ण खेळी खेळली. या मोसमातील त्याचे हे सहावे शतक असून त्याने या मोसमात ५०० धावांचा टप्पाही पार केला आहे. आता वॉर्नर आयपीएलच्या इतिहासात सात हंगामांत ५००हून अधिक धावा करणारा पहिला खेळाडू ठरला आहे. याबाबतीत त्याने विराट कोहलीला मागे टाकले आहे, कारण कोहलीने हा पराक्रम आयपीएलच्या सहा हंगामांत केला आहे.

विराटनंतर आयपीएल हंगामात सर्वाधिक जास्त वेळा ५००पेक्षा जास्त धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये केएल राहुल आणि शिखर धवन यांचा क्रमांक लागतो. या दोघांनीही पाच वेळा ही कामगिरी केली आहे.


















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com